बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे




गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ५० | बुधवार,दि.२२ नोव्हेंबर २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# धानाला नागपूर हिवाळी अधिवेशनात बोनस जाहीर करणार



- मुख्यमंत्र्यांची शासन आपल्या दारी कार्यक्रमात घोषणा
- जिल्हास्तरीय कार्यक्रमाला हजारो लाभार्थ्यांची उपस्थिती
- जिल्ह्यात ई-पिक पाहणीला ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ
- उपस्थित २० हजाराहून अधिक लाभार्थ्यांना रोपट्यांचे वाटप



**भंडारा :** भंडारा जिल्ह्यातील धान हे प्रमुख पिक आहे. धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी धानाला बोनस देण्याची मागणी होत आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी शासन सातत्याने काम करते आहे. त्यामुळे नागपूर येथे होऊ घातलेल्या हिवाळी अधिवेशनात धानाला बोनस जाहीर करू, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

शासन आपल्या दारी अभियानांतर्गत जिल्हास्तरीय कार्यक्रम चैतन्य पोलीस मैदान, भंडारा येथे आयोजित करण्यात आला होता. जिल्हाभरातून उपस्थित हजारो लाभार्थ्यांना संबोधित करतांना मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी ही घोषणा केली. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री डॉ.विजयकुमार गावित, खा.सुनील मेंढे, आ.नरेंद्र भोंडेकर, आ.राजु कारेमोरे, माजी मंत्री परिणय फुके, माजी खासदार शिशुपाल पटले, माजी खासदार मधुकर कुकडे, माजी आमदार नानाभाऊ पंचबुद्धे, चरण वाघमारे, विशेष पोलिस महानिरिक्षक छेरींग दोरजे, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, मुख्य कार्यकारी अधिकारी समीर कुर्तकोटी, पोलिस अधीक्षक लोहित मतानी उपस्थित होते.

धान हे जिल्ह्यातील प्रमुख पिक आहे. धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी धानाला बोनस जाहीर करावे, अशी विनंती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणातून केली होती. त्यानुसार येत्या नागपूर अधिवेशनात बोनस जाहीर करण्याची ग्वाही मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी दिली. जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा धान जलदगतीने खरेदी होणे आवश्यक आहे. त्यासाठी सद्या सुरु असलेली खरेदी केंद्रे पुरेशी नसल्याने उर्वरीत केंद्र सुरु करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी जिल्हा प्रशासनास दिले.

सद्या शेतकऱ्यांच्या पिकांचा ई-पिक पाहणी कार्यक्रम राबविला जात आहे. प्रत्येक शेतकऱ्यांना ई-पिक पाहणी करता यावी, यासाठी भंडारा जिल्ह्यात पिक पाहणीच्या कार्यक्रमास दि.३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याची घोषणा देखील यावेळी मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी केली. समृध्दी महामार्ग भंडारा, गोंदिया, गडचिरोलीपर्यंत आपण वाढवितो आहे. या मार्गाच्या डीपीआरचे काम गतीने होत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

भंडारा नैसर्गिक वैविध्यता लाभलेला जिल्हा आहे. पर्यटनवाढीला या जिल्ह्यात मोठा वाव आहे. जिल्ह्यात पितळ उद्योग क्लस्टर उभारण्याची मागणी होत आहे. जिल्ह्याच्या पर्यटनासह उद्योग वाढीसाठी आवश्यक त्या बाबी करण्यास शासन कटीबद्ध आहे. सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी राज्यभर शासन आपल्या दारी हा कार्यक्रम आपण राबवितो आहे. सर्वसामान्य गरीब लाभार्थ्यांना त्यांच्या दारी जावून योजना बहाल करण्याचा हा कार्यक्रम असून राज्यात १ कोटी ८४ लाख लाभार्थ्यांना कार्यक्रमाने थेट लाभ मिळवून दिला आहे.

सर्वसामान्य शेतकरी, कष्टकऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर कामे केली जात आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आपण केवळ एक रुपया भरून पिकविम्याचा लाभ देण्याची योजना सुरु केली. लाखो शेतकऱ्यांच्या पिकाला या योजनेने संरक्षण दिले. प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या धर्तीवर शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आपण नमो शेतकरी सन्मान योजना सुरु केली. केंद्र शासनाने ६ हजार आणि राज्य शासनाच्या योजनेचे ६ हजार असे १२ हजार रुपये राज्यातील शेतकऱ्यांना दिले जात आहे. अशा प्रकारची योजना राबविणारे महाराष्ट्र देशातील पहिलेच राज्य असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

आपत्तीच्या काळात नुकसानग्रस्तांना चांगली मदत देता यावी यासाठी आपण एनडीआरएफ चे नियम बाजूला ठेऊन अधिक मदत देण्याचे धोरण स्विकारले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना २ ऐवजी ३ हेक्टरपर्यंत मदत देण्याचा निर्णय घेतला. पुरबाधित कुटुंबांना ५ हजार रुपये नुकसान भरपाई दिली जात होती. ही भरपाई आपण १० हजार रुपये ईतकी केली. सततच्या पावसामुळे होणारे नुकसान आपण नुकसान भरपाईच्या टप्प्यात आणले. सर्वसामान्य गरीब कुटुंबांना शस्त्रक्रीया, उपचारांसाठी दिलासा देण्याकरीता महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत आता ५ लाखापर्यंत उपचार मोफत करण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्य परिवहन महामंडळाच्या बसमध्ये महिलांना ५० टक्के सवलत, ज्येष्ठ नागरिकांना संपुर्ण मोफत प्रवास असे अनेक जनकल्याणकारी निर्णय आम्ही घेतले. समाजातील सर्वच घटकांना दिलासा देण्याचा प्रयत्न आम्ही करतो आहे. येत्या काळात सर्वसामान्य नागरिक, लाभार्थ्यांना आपल्या कामासाठी शासकीय कार्यालयात जावे लागणार नाही. घरबसल्या सर्व सुविधा त्यांना मिळतील, असे पुढे बोलतांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

**शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज देऊ-देवेंद्र फडणवीस**

शेतकऱ्यांच्या कृषि पंपांना दिवसा पुरेशी वीज मिळणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांसह सर्वच स्तरावरुन ही मागणी होत आहे. त्यामुळेच आपण मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजना सुरु केली. येत्या काही दिवसात कृषि फिडर सौरऊर्जेवर टाकून शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज पुरवठा उपलब्ध करुन दिला जाणार आहे, असे यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

शासकीय योजना सर्वसामान्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासन आपल्या दारी हे अभियान राबविण्यात येत आहे. यंत्रणेने देखील योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवून त्यांना सक्षम करण्यासाठी काम करण्याची गरज आहे. भंडारा हा तलाव, जंगल, वने तसेच धानाचा जिल्हा आहे. जिल्ह्याच्या पर्यटनासह उद्योग विकासासाठी आम्ही प्रयत्न करतो आहे. राज्याने शेतकऱ्यांसाठी केवळ एक रुपया भरुन सुरु केलेल्या सर्वसमावेशक पिकविमा योजनेत पहिल्याच वर्षी १ कोटी ६६ लाख शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर दिलासा देणारी ही योजना ठरली आहे.

शासनाने अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका, मदतनीस यांचे मानधन वाढविले. पोलिस पाटलांच्या मानधन वाढीचा देखील विचार सुरु आहे. शासनाने शिष्यवृत्तीची रक्कम वाढविली. ओबीसी घटकाकरीता मोदी आवास योजना सुरु केली असून ओबीसीसाठी १० लाख तर अनुसूचित जाती, जमातीसाठी ५ लाख घरांचे उद्दिष्ट आपण ठेवले आहे. सर्वसामान्यांना घर मिळाले पाहिजे, अशी शासनाची भूमिका आहे.

भंडारा जिल्ह्यात अंभोरा येथे ३५२ कोटी रुपयांचा जल पर्यटन प्रकल्प आपण राबवितो आहे. याप्रकल्पामुळे जिल्ह्याच्या पर्यटनासह रोजगार निर्मितीला प्रोत्साहन मिळेल. गोसेखुर्द राज्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. केंद्र शासनाने देखील या प्रकल्पाला निधी उपलब्ध करून दिला आहे. २०२४ च्या शेवटपर्यंत या प्रकल्पाचे काम पुर्ण करून शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून देऊ, असे उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले.

**एक हजार ९५४ कोटींच्या अग्रीमाचे वाटप-अजित पवार**

यावर्षीपासून आपण महत्वाकांक्षी सर्वसमावेशक पिकविमा योजना सुरु केली. योजनेंतर्गत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना राज्यभर अग्रीम रक्कमेचे वाटप केले जात आहे. नुकसान भरपाईसाठी ४७ लाख ६३ हजार अर्जांना मंजूरी देण्यात आली असून आतापर्यंत ९६५ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. या योजनेसाठी यावर्षी पहिल्यांदाच १ कोटी ७१ लाख शेतकऱ्यांनी नोंदणी केली.

शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शुन्य टक्के व्याजाने पिककर्ज, पुरग्रस्तांना दुप्पटीने आर्थिक मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. भंडारा जिल्ह्यात धान पिक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. शेतकऱ्यांनी धानासोबतच नगदी पिके देखील घेतली पाहिजे. भंडारा येथे वैद्यकीय महाविद्यालय व्हावे, अशी मागणी होती, ती पुर्ण करण्यात आली आहे. लवकरच निविदा काढून महाविद्यालयाचे बांधकाम सुरु केले जातील, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करतांना पालकमंत्री डॉ.विजयकुमार गावित यांनी शासन आपल्या दारी अभियानातून जिल्ह्यातील ५० ते ६० टक्के लाभार्थ्यांना प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष लाभ देण्यात आला असल्याचे सांगितले. गोसेखुर्द प्रकल्पाच्या ठिकाणी पर्यटनवाढीला संधी आहे. त्याला गती मिळणे आवश्यक आहे. जिल्ह्यात खताच्या व कृषी निविष्ठाच्या जलद उपलब्धतेसाठी रॅक पॉईट नसल्याने अडचण होते. केंद्र शासनाकडे यासाठी पाठपुरावा होणे आवश्यक आहे. रेशीम उद्योग आणि वैद्यकीय महाविद्यालयाच्या बांधकामाला गती मिळावी, असे ते म्हणाले.

प्रास्ताविक जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. शासन आपल्या दारी अभियान कालावधीत जिल्ह्यात २ लाख ९ हजार ७५६ लाभार्थ्यांना विविध विभागाच्या विविध योजनांचा लाभ देण्यात आला असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. देण्यात आलेल्या लाभाची रक्कम ३०४ कोटी रुपये ईतकी आहे. एकट्या महसूल विभागाने या कालावधीत ९९ हजार दाखल्यांचे वितरण केले असल्याचे ते म्हणाले. यावेळी मुख्यमंत्री कार्यालयातील जनकल्याण कक्षाचे प्रमुख डॉ.अमोल शिंदे यांनी शासन आपल्या दारी अभियानाची भूमिका व फलनिष्पत्ती याबाबत माहिती दिली.

सुरुवातीस मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांसह मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करुन अभिवादन केले. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी रिमोटची कळ दाबून शासन आपल्या दारी कार्यक्रमाचा शुभारंभ केला. यावेळी विविध योजनेच्या २७ लाभार्थ्यांना विविध लाभाचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. भंडारा जिल्ह्यातील १६८ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमस्थळी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. विविध नामांकित कंपन्यांच्यावतीने त्यांच्याकडील रिक्त १ हजार ५०० जागांसाठी उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. मुलाखतीद्वारे निवड झालेल्या निवडक उमेदवारांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.

कार्यक्रमस्थळी विविध शासकीय विभागाचे स्टॉल लावण्यात आले होते. सर्वसामान्य नागरिकांना आपले निवेदन, तक्रार, म्हणणे सादर करता यावे यासाठी मुख्यमंत्री कार्यालयाच्यावतीने स्वतंत्र दालन लावण्यात आले. रोजगार मेळाव्यात अनेक युवकांनी मुलाखती देऊन रोजगाराच्या संधीचा लाभ घेतला. कार्यक्रमासाठी आलेल्या लाभार्थ्यांना नास्ता, पाणी, भोजन व प्रवासाची व्यवस्था प्रशासनाच्यावतीने विनामुल्य करण्यात आली होती. कार्यक्रमास आलेल्या लाभार्थ्यांना प्रदर्शनस्थळी विविध योजनांची माहिती देण्यात आली. जिल्हास्तरीय कार्यक्रमाची सुरुवात राज्य गीताने झाली तर शेवट राष्ट्रगिताने झाला. आभार मुख्य कार्यकारी अधिकारी समीर कुर्तकोटी यांनी मानले. कार्यक्रमास जवळपास २० हजारावर लाभार्थी, नागरिक उपस्थित होते.

# अधिवेशनाची लगबग,विधानभवन,मंत्र्यांचे बंगले दुरूस्ती

**नागपूर :** सात डिसेंबरपासून नागपूरमध्ये सुरूहोणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाची जोरदार तयारी प्रशासनाकडून केली जात आहे. २७ नोव्हेंबरला विधिमंडळ सचिवालयचे कार्यालय उपराजधानीत सुरू होणार आहे. सध्याच्या वेळापत्रकानुसार अधिवेशनाचे कामकाज दोन आठवडे निश्चित करण्यात आले आहे. ते तीन आठवड्याचे घ्यावे, अशी मागणी विरोधी पक्षांनी केली आहे. याबाबत अंतिम निर्णय कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीतच होण्याची शक्यता आहे. दरम्यान, प्रशासनाकडून अधिवेशनाची तयारी सुरूझाली आहे. विधानभवनात



रंगरंगोटी केली जात आहे. खुर्च्या, मंत्र्यांची दालने सजवली जात आहेत. विधानसभा अध्यक्ष, विधान परिषदेच्या उपसभापतींच्या निवासस्थानांसह मुख्यमंत्री, उपमुख्यमंर्त्यांच्या निवासस्थानांची देखभाल दुरुस्ती केली जात आहे. अधिवेशनापूर्वी एक आठवड्याआधी साधारणपणे विधिमंडळ सचिवालयाचे कामकाज सुरूहोते. त्यासाठी मुंबईतून कागदपत्रे व महत्त्वाच्या फाईल्स ट्रकद्वारे नागपूरातून आणली जात आहे. यासाठी २५ लोखंडी ट्रंक भाड्याने घेण्यात येणार आहे. मुंबईतून अधिवेशनासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निवासाची व्यवस्था नेहमीप्रमाणे करण्यात आली आहे. विधानभवन परिसरात मंडप टाकण्याचे काम सुरूआहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या देवगिरी बंगल्यात सुरक्षिततेच्या दृष्टीने वेगळा रस्ता तयार केला जात आहे. दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासाठी नव्याने बंगला शोधण्यात आला असून त्याला विजयगड असे नाव देण्यात आले आहे.

### अनिल देशमुख गोंदिया दौऱ्यावर

**गोंदिया**–राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते आ. अनिल देशमुख हे २२ नोव्हेंबरला गोंदियाच्या एक दिवसीय दौऱ्यावर येणार आहे.अनिल देशमुख यांच्या प्रमुख उपस्थीतीत दुपारी २ वाजता ग्रिनलँड लॉन, रिंग रोड टी पॉइंट, गोंदिया येथे प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक सुध्दा होणार आहे. या बैठकीला माजी खासदार खुशालराव बोपचे, प्रदेश राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उपाध्यक्ष बजरंगसिंह परिहार, माजी आमदार दिनानाथ पडोळे, दिलीप पनकुले, रविकांत बोपचे,सौरभ रोकडे,मिथून मेश्राम यांच्यासह इतर मान्यवर उपस्थीत राहणार आहेत.

# अर्ध नग्न व मुंडन आंदोलन करुन केला शासनाचा निषेध

## झाशीनगर उपसा सिंचन योजनेच्या कालव्यावर केले आंदोलन

**अर्जुनी मोर :** तब्बल १२७ कोटी रुपये मंजूर असलेली उपसा सिंचन योजना प्रशासनासह लोकप्रतिनिधींच्या नाकर्तेपणामुळे रखडली असून या योजनेकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अर्ध नग्न व मुंडन आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन २० नोव्हेंबर रोजी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार गटाचे गोंदिया जिल्ह्याचे कार्याध्यक्ष मिथुन मेश्राम यांच्या नेतृत्वात झाशी नगर उपसा सिंचन योजनेच्या कालव्यावर करण्यात आले. या आंदोलनाने शासनाचा निषेध करण्यात आला आहे.

सविस्तर असे की, ऑक्टोबर १९९६ ला इटियाडोह प्रकल्पातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध व्हावा म्हणून झाशी नगर उपसा सिंचन योजना मंजूर करण्यात आली होती. या योजनेवर आतापर्यंत १२७ कोटी रुपये खर्च करण्यात आले असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

दरम्यान, शासनाच्या जलसंधारण विभागाअंतर्गत प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसाठी ही योजना मंजूर करण्यात आली होती मात्र शासनाची उदासीनता व राजकारण्यांच्या नाकर्तेपणामुळे तब्बल २८ वर्षे लोटून देखील बाधित असलेल्या शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळू शकले नसल्याचाही आरोप करण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार गटाचे गोंदिया जिल्ह्याचे कार्याध्यक्ष मिथुन मेश्राम यांच्या नेतृत्वात प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता यांना निवेदन देऊन प्रस्तावित गावांना पाणी देण्याची मागणी करण्यात आली होती असे न झाल्यास अर्ध नग्न व मुंडन आंदोलनाचा इशाराही देण्यात आला होता.

त्यानुसार २० नोव्हेंबर रोजी झाशीनगर उपसा सिंचन योजनेच्या कालव्यावर अर्ध नग्न व मुंडन आंदोलन करण्यात आले. यावेळी सुरेश खोब्रागडे, बाबुलाल नेवारे, हिरालाल डोंगरे, राहुल भोयर, कुंडलिक चनाप, हेमराज लाडे, राजकुमार इश्वार, रामदास पेकु, सुदाम दोनोडे, भाष्कर डोमळे, गोवर्धन राऊत, देविदास राऊत, राजकुमार कुरसुंगे, चिंतामण भोगारे, अमृत शेंडे, दिपक दाणे,चेतन मोहतुरे, अजय मेश्राम यांसह अन्य शेकडो प्रकल्पबाधित शेतकरी ऊपस्थित होते.



### ४२ गावातील जवळपास ५० हजार शेतकऱ्यांना मिळणार पाणी

**इटियाडोह प्रकल्पातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध व्हावा म्हणून झाशी नगर उपसा सिंचन योजना मंजूर करण्यात आली होती. या योजनेअंतर्गत प्रकल्पातील प्रस्थापित १२ गावे व नवेगाव बांधत जलाशया अंतर्गत ३२ गावातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करावयाचे होते. ही योजना पूर्ण होऊन शेतकऱ्यांना सिंचन सुविधा उपलब्ध झाल्यास जिल्ह्यातील जवळपास ५० हजार शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे.**

**झाशी नगर हे गाव १९७० ला पुनर्वसित झाले आहे. हे गाव कोरडवाहू असल्याने येथील शेतकऱ्यांना मदत होण्यासाठी खासदार महादेवराव शिवनकर यांच्या नेतृत्वात ही योजना सुरू करण्यात आली होती. येथील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळेल व त्यांचे जीवनमान उंचावेल हा मुख्य हेतू होता. ही योजना पूर्ण न झाल्यास येणाऱ्या २ ते ३ महिन्यात संपूर्ण गावाच्या वतीने जल आंदोलन करण्यात येईल व २०२४ च्या निवडणुकीला आम्ही बहिष्कार टाकू.**


**- राजाराम कुरसुंगे ( प्रकल्पबाधित शेतकरी )**

**मंजूर झालेल्या निधी पैकी जवळपास ८६ कोटी खर्च करुन देखील झाशी नगरच्या शेवटच्या टोकापर्यंत पाणी गेलेले नाही. २०२२ मध्ये शासनाने भूलथापा देऊन केवळ ४ दिवस नवेगाव बांधामध्ये पाणी पाडले. प्रस्तावित १२ व नवेगाव बांध जलाशयातील ३२ शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळण्यासाठी ही योजना पूर्ण झाली पाहिजे म्हणून शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले.**

**- मिथुन मेश्राम (कार्याध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार गट)**

# मृत व्यक्ती बग्गाच्या नावे कसे काढले जीएसटीचे ९ लाख

- कंत्राटदार पी.ए.बग्गा प्रकरणात पोलीस कारवाई थंडबस्त्यात
- वित्त विभागाच्या दुर्लक्षतेमुळे मृत व्यक्तीच्या नावे जीएसटीची रक्कम




बग्गा यांची जीएसटी नोंदणी रद्दचे हेच ते कागद

**गोंदिया–** जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाच्यावतीने मृत व्यक्तीच्या नावे असलेल्या जीएसटीची नोंदणी न तपासता १२ टक्के जीएसटीची सुमारे ९ लाख रुपयाची रक्कम कामाच्या देयकासोबत कुठल्या आधारावर देण्यात आली असून या जीएसटी रक्कमेचा एकप्रकारे अपहारच याप्रकरणात झाल्याचा मुद्दा समोर आला आहे.तसेच जीएसटी नोंदणी रद्द झालेल्या व्यक्तीच्या नावे जीएसटीची रक्कम कशी देण्यात आली अशा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.सदर प्रकरण सर्वात आधी बेरार टाईम्सने प्रकाशित करुन समोर आणले होते.

सविस्तर असे की, पी.ए.बग्गा यांनी जि.प.बांधकाम विभागाकडे निविदेकरीता जेव्हा कागदपत्र सादर केले आणि त्यानंतरच्या कागदपत्रातील स्वाक्षरी आणि तडजोडीकरीता मिळालेल्या दोन पत्रामधील स्वाक्षरीत स्पष्ट फरक दिसून येते.सोबतच सबंधित शासकीय विभागाला फर्मचे संचालक मृत्यू झाल्याचे का कळविण्यात आले नाही हाच सर्वात मोठा मुद्दा आहे. पी.ए.बग्गा यांची जीएसटी नोंदणी ही १४ ऑक्टोंबर २०१९ ला झाली.आणि जीएसटीची नोंदणी १९ फेबुवारी २०२१ ला रद्द झालेली असतानाच करारनाम्यावर जीएसटीची प्रत कशी जोडण्यात आली हा चौकशीचा विषय ठरला असून १२ टक्के जीएसटीची रक्कम ९ लाख रुपये वित्त व बांधकाम विभागाने चौकशी न करता कुठल्या आधारावर दिली हा सुध्दा चौकशीचा विषय झालेला आहे.

त्यानंतरही त्या व्यक्तीच्या मृत्यूची माहिती अधिकृतरित्या जिल्हा परिषद बांधकाम विभाग व ICICI बँकेला न देता त्या कामापोटी मिळालेले सुमारे ७० लाख रुपये हे मृत व्यक्तीच्या खात्यात जमा करण्यात आले.त्यातच जीएसटीची१२ टक्के रक्कम वित्त विभागाने दिले.

तर मृत व्यक्ती पी.ए. बग्गा यांच्या वारसदारानेही ती जीएसटीची रक्कम जीएसटी नोंदणी रद्द झाल्यानंतरही संबधित विभागाला परत न केल्याने त्यावर जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाच्यावतीने कारवाई करायला हवी असतानाही अद्यापही कुठलीच कारवाई झालेली नाही.

त्यातच भरनोली येथील ७ लाख १५ हजार रुपयाच्या कामाची निविदा पी.ए.बग्गा कॉन्ट्रक्टर एण्ड सप्लायर यांनी सादर केली होती.ती निविदा ०.११ टक्के कमी दराने सादर केल्याने बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता यांनी ४ मार्च २०२२ रोजी तत्कालीन अति.मुख्य कार्यकारी अधिकारी शितल पुंड यांच्या कक्षात तडजोड करण्यासाठी सदर कंत्राटदाराला बोलावले होते.त्यावेळी अती.मुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियंत्या यांच्या लक्षात सदर विषय का आला नाही हा सुध्दा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे याप्रकरणात गोंदिया ग्रामीण पोलीस ठाण्यात वर्षभरापासून तक्रार दाखल करण्यात आले.बांधकाम विभागातील अनेकांचे बयाण नोंदवण्यात आले,परंतु अद्यापही त्या प्रकरणाचा तपास का पुर्ण होऊ शकला नाही,तसेच न्यायालयात या प्रकरणाचे आरोपपत्र अद्यापही सादर न झाल्याने पोलीस विभागाच्याही कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ लागले आहे.

या फर्मचे संचालक प्रितपालसिंग अमोलकसिंग बग्गा यांचा मृत्यू १९ फेबुवारी २०२१ रोजी झाल्याने त्याची नोंद ३ मार्च २०२१ रोजी नगरपरिषद गोंदिया येथे करण्यात आली असून त्यासंदर्भातील मृत्यू प्रमाणपत्र १७ ऑगस्ट २०२२ रोजी जारी करण्यात आले आहे.जर सदर व्यक्ती मार्च २०२१ मध्ये मृत्यू झाला असेल तर मार्च २२ मध्ये त्यांच्या नावावर हजर राहिलेली व्यक्ती कोण हा प्रश्न उपस्थित झाला असून शासनाची फसवणूक करीत स्वाक्षरीमध्ये हेरफार करण्यात आल्याचे स्पष्ट झाल्याने लहान कर्मचाऱ्यांच्यावरच तपासाची चक्रे फिरवण्याऐवजी मोठ्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यानाचीही सखोल चौकशी या प्रकरणात होणे गरजेचे झाले आहे. वरिष्ठांच्या आदेशाने काम करणाऱ्या लहान कर्मचाऱ्यांचा बळी देण्याचा प्रयत्न या प्रकरणातही दिसून येत आहे.जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत पुन्हा हा विषय आल्याने प्रशासन आत्ता तरी इमानेइतबारे या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून काम करेल काय याकडे लक्ष लागले आहे.

## संपादकीय

# मराठी भाषा टिकविण्याची कसरत

मराठी भाषा ही महाराष्ट्राची राज्यभाषा आहे तसेच जगभरात ८३ दशलक्षांहून अधिक लोकांमध्ये ती बोलली जाते. मराठी भाषेला समृद्ध साहित्यिक, ग्रंथ, प्राचीन इतिहास आणि कवितांची अतुल्य परंपरा लाभली गेली आहे. बदलत्या काळाप्रमाणे जसजसा भारत विकसनशील देशांकडून विकसित देशांच्या रांगेत येणाऱ्या शर्यतीत कूच करत असताना, जागतिक व्यवहारात वापरली जाणारी इंग्रजी भाषा आपली पकड सर्वत्र अधिक मजबूत करत आहे. आता मराठी भाषिकांच्या संख्येत दिवसेंदिवस घट होत असताना आता मराठी भाषेच्या भविष्याची चिंता सर्वांना वाटू लागली आहे?

साखर कारखान्यात जशी उसापासून साखर निर्मिती केली जाते त्याचप्रमाणे पूर्वी लहान मुलांमध्ये मराठी भाषेची गोडी लावणारा मराठी शाळेच्या रूपातील कारखाना जणू विविध विषयांद्वारे मुलांच्या मनात साखर पेरणी करून मराठी भाषेचा गोडवा वाढवण्याचे काम करायचा. सकाळपासून सुरू होणाऱ्या राष्ट्रगीतापासून पसायदान व अभंगांपर्यंत तोंडपाठ असलेली मुले जणू मराठी भाषेचे रक्षक उभे आहेत, असा जणू भास व्हायचा. मातृभाषेतून साहित्य व ग्रंथांची गोडी लावता लावता जणू एका गुरुशिष्याच्या पवित्र नात्याचा जन्म झाला तो फक्त मराठी शाळांमध्येच!

देशात जागतिकीकरणाची सुरुवात होताच महाराष्ट्रातील मराठी शाळांना जणू ग्रहण लागायला सुरुवात झाली. एकेकाळी महाराष्ट्रात मातृभाषेतून शिक्षण घेण्याचा अभिमान असणारी लोकांची काळाप्रमाणे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या शर्यतीत पिछेहाट व्हायला सुरुवात झाली. पालकांची इच्छा नसून देखील आपल्या पाल्याला शर्यतीच्या युगात मागे राहू नये म्हणून इंग्रजी शाळांमध्ये मोठ्या देणग्या देऊन प्रवेश घ्यावा लागला आणि मराठी भाषेच्या गळचेपीचा दोर तेथूनच बांधायला सुरुवात झाली. दशकांचा इतिहास असलेल्या व अभिमानाने उभ्या असणाऱ्या मुंबईतील महानगरपालिकेच्या मराठी माध्यमांच्या शाळा विद्यार्थ्यांच्या पटसंख्येअभावी तुकड्या कमी होऊन होऊन एक दिवस शाळेलाच कुलूप लावण्याची वेळ आली. सध्या बोटांवर मोजण्या एवढ्या राहिलेल्या मराठी माध्यमांच्या शाळा पटसंख्या कमी होत असल्यामुळे आपला शेवटचा श्वास घेत आहेत. कधीकाळी मुंबईमधील याच मराठी शाळांमध्ये प्रवेश घेण्यासाठी उत्सुक असणारी मराठी माणसे नक्की गेली तरी कुठे?

देशाची आर्थिक राजधानी बनलेली मायानगरी मुंबई एकेकाळी मराठी माणसाच्या ऐक्याचा व संस्कृतीचा गड म्हणून ओळखला जायचा. हळूहळू या गडाला अनियंत्रित महागाईच्या आक्रमणाने व त्याबरोबर वाढत्या कौटुंबिक वादाने मुंबईच्या या गडावरील मराठा मावळे मुंबईबाहेर विखुरले गेले व काळानुसार अमराठी भाषिकांची पकड मुंबईवर मजबूत होत गेली. या झालेल्या बदलात फक्त मराठी माणूसच मुंबईबाहेर गेला नाही, तर त्याच्यासोबत मराठी शाळा व जुन्या वस्त्या देखील काळाबरोबर पडद्याआड होत गेल्या व मराठी भाषेच्या गळचेपीचा दोर अजून घट्ट होत गेला. अमराठी शाळांमध्ये मराठी विषय अनिवार्य करणे आणि सरकारी कार्यालयांमध्ये मराठीचा जास्त वापर करण्यास प्रोत्साहन देणे यांसारख्या भाषेच्या संवर्धनासाठी सरकारने पावले उचलत असताना आपणदेखील तेवढाच पाठिंबा देणे गरजेचे आहे. भविष्यात मराठी भाषेच्या जागतिक प्रसारासाठी माहिती तंत्रज्ञानाचा मोठा मोलाचा वाटा असणार आहे. इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या युगात लोकांसाठी मराठी साहित्य व पुस्तके एका क्लिकवर उपलब्ध होत आहेत. विकिपीडिया, गुगल आणि यूट्यूबसारखी ऑनलाइन प्लॅटफॉर्म आता मराठीत उपलब्ध करुन दिल्यामुळे, भाषेबद्दलची माहिती सुलभ व जलदरीत्या मिळण्यास मदत होते आहे. आपल्या कर्मभूमीवर व तेथील राज्यभाषेवर निर्विवाद प्रेम कसे करावे, हे दाक्षिणात्य अभिनेता शिवाजीराव रामोजीराव गायकवाड ऊर्फ सुपरस्टार रजनीकांत यांच्याकडून शिकण्यासारखे आहे. रजनीकांत यांचा जन्म हा एका मराठी कुटुंबात झाला असला तरी त्यांनी आपल्या अभिनयाच्या कलेतून दाक्षिणात्य सिनेविश्वाला एका नव्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. त्यांच्या या भाषेवरील प्रेमामुळे दाक्षिणात्य भागात त्यांना चाहत्यांकडून देवाचा दर्जा दिला जातो. मुंबईत नोकरी व व्यवसायानिमित्त येणाऱ्या अनेक इतर भाषिकांनी मराठी भाषेला सन्मानाने स्वीकारुन त्यावर नि:स्वार्थीपणे प्रेम करावे ही प्रत्येक स्थानिक भूमिपुत्रांची अपेक्षा असते. बदलत्या काळाबरोबर आपण मराठी भाषा वाढवण्यासाठी व भविष्यात टिकवण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन आपण काय उपाययोजना करू शकतो यावर मराठी भाषेचे भवितव्य अवलंबून आहे. मराठीचे आधुनिकीकरण करणे ही एक काळाची गरज बनली आहे. आधुनिक मराठीमुळे आपला समृद्ध संस्कृतीचा व साहित्याचा वारसा नवीन पिढीपर्यंत पोहोचवण्यात व तो टिकवण्यास नक्की मदत होईल.

**नितीन पडते,** ठाणे (प.)

# सिंधू संस्कृतीचा खरा नायक बळीराजा-प्रबोधनकार डॉ.अभिविलास नखाते

## विविध क्षेत्रात उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्यांचा सत्कार





**नागपूर:** सिंधू संस्कृतीचे आपण वंशज आहोत. त्या संस्कृतीचा खरा नायक हा बळीराजा होता. जेव्हापासून बळीराजा होता तेव्हापासून ही प्रथा आपल्या पूर्वजांनी चालविली आहे. आतापर्यंत सुरु असलेली परपरा अधिक जोमाने चालविण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन प्रबोधनकार महिला महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. अभिविलास नखाते यांनी रविवारी अध्यक्षस्थानावरुन केले.

शेतकरी, कष्टकऱ्यांच्या राजा महाबली महासम्राट बळीराजाची आठवण म्हणून बळीराजा महोत्सव रविवारी (दि.१९) सकाळी संविधान चौक येथे आयोजित करण्यात आला होता. या महोत्सवात विविध क्षेत्रात उत्कृष्ठ कामगिरी केलेल्या मान्यवरांना बळीराजा सम्मान प्रदान करण्यात आला. बळीराजाच्या जीवनावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला.

मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून ओबीसी जनमोर्चाचे उपाध्यक्ष प्रा.रमेश पिसे,ज्ञानेश्वर रक्षक, प्रा.आनंद मांजरखेडे, कृषीतज्ज्ञ अमिताभ पावडे, बळीराजा क्लबचे संयोजक उमेश कोर्राम, अधिसभा सदस्य राहुल हनवते, विधि सल्लागार ॲड. अंजली साळवे,




गोविंद भेंडारकर, जगजित सिंग, नरेंद्र गद्रे, प्रा.आनंद मांजरखेडे, सावन कटरे, अतुल खोब्रागडे उपस्थित होते.

डॉ.नखाते म्हणाले, अलिखित संविधान देणारा पहिला सम्राट बळीराजाच होता. त्यानंतर बळीराजाचे पुढे कार्य समोर नेण्याचे कार्य महान सम्राट अशोक यांनी केले. या काळात समृद्धी होती. भारताला स्वतंत्र मिळाल्यावर बळीराजाचे काम संविधान लिहून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. त्यामुळे हे तीन नायक आपल्याला सदैव लक्षात राहिले पाहिजे. बळीराजाविषयी पुढच्या पिढीला संदेश देणे आवश्यक आहे. याकरिता गावागावात अशाप्रकारचे महोत्सव कार्यक्रम आयोजित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी बळीराजा सम्मान जीवन गौरव पुरस्कार नागेश चौधरी, दीनानाथ वाघमारे, महिला पुरस्कार हेमलता लोहवे, लेखिका विजया मारोतकर, शिक्षण पुरस्कार एकलव्य इंडिया फाऊंडेशन आकाश नवघरे, पत्रकारिता पुरस्कार प्रमोद गणवीर, राजेश्वर ठाकरे, सुनील ढगे, कृषी पुरस्कार प्राची माहुरकर, क्रीडा पुरस्कार ओजस देवतळे, अभिषेक ठवरे, सामाजिक कार्य पुरस्कार सावरकर, वंदना वणकर यांना प्रदान करण्यात आला.

महोत्सवात बळीराजा, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित गीत सादर करण्यात आले. गुंजन हटवार, संदीप चौहान आणि अविनाश साखरकर यांनी गीत सादर केले. प्रा. रमेश पिसे यांनी विदर्भातील युवकांनी आता जागृत होण्याची गरज असून विदर्भाच्या आंदोलनाला पाठिंबा देण्याचे आवाहन केले. तसेच वेगळा विदर्भ हवा यावर त्यांनी जोर दिला.



कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पियुष आकरे, नीलेश तिघरे, देवेंद्र समर्थ, आकाश वैद्य, नयन कालबांधे, अनुप खडतकर, हर्षल राऊत, समीप नरुले, मनीष गिरडकर यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उमेश कोर्राम, संचालन कृतल पियुष आकरे यांनी तर राहूल हनवते यांनी आभार मानले.







## विदर्भात २२२ धान खरेदी केंद्रे सुरू

**मुंबई :** विदर्भातील प्रमुख धान उत्पादक जिल्ह्यात मार्केटिंग फेडरेशन मार्फत ५१ तर आदिवासी विकास महामंडळाची १७१ अशी एकूण २२२ धान खरेदी केंद्रे सुरु करण्यात आली असल्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

किमान आधारभूत किंमत खरेदी योजना ही केंद्र शासनाची योजना असून शेतकऱ्यांच्या हितासाठी आहे. महाराष्ट्र राज्यात केंद्र शासनाची ‍नोडल एजन्सी म्हणून भारतीय अन्न महामंडळ काम पाहते, तर भारतीय अन्न महामंडळाच्यावतीने राज्य शासनामार्फत महाराष्ट्र राज्यात किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई (बिगर आदिवासी क्षेत्रात) व महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक (आदिवासी क्षेत्रात) या दोन अभिकर्ता संस्थांमार्फत करण्यात येते.९ नोव्हेंबर २०२३ पासून धान खरेदी करण्याच्या सूचना आहेत.

धान खरेदीकरिता विदर्भातील प्रमुख धान उत्पादक जिल्ह्यांमध्ये आतापर्यंत सुरू करण्यात आलेल्या खरेदी केंद्रांचा अभिकर्ता संस्थानिहाय तपशील पुढीलप्रमाणे आहे.यामध्ये गोंदिया जिल्ह्यात मार्केटिंग फेडरेशनचे ३१, तर आदिवासी विकास महामंडळाची ३६ खरेदी केंद्रे आहेत. भंडारा मध्ये मार्केटिंग फेडरेशनचे २०, गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळाची ९०, तर चंद्रपूर जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळाची ३५ आणि नागपूरमध्ये २, तर अमरावती जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळाची ८ अशा प्रकारे विदर्भात प्रमुख धान उत्पादक जिल्ह्यात मार्केटिंग फेडरेशन मार्फत एकूण ५१, तर आदिवासी विकास महामंडळाची एकूण १७१ अशी विदर्भात एकूण २२२ धान खरेदी केंद्रे सुरू करण्यात आली असल्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

## जागतिक मत्स्य दिन साजरा

**भंडारा–** सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय मध्ये जागतीक मत्स्य दिवस साजरा करण्यात आला.या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा नियोजन अधिकारी शशीकुमार बोरकर, मुख्यमंत्री फेलो निलेश साळुंखे, सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय उमाकांत सबनीस, जिल्हा मध्यवती सहकारी बँक उपाध्यक्ष सदाशीवराव वलथरे, जिल्हा मच्छीमार संघ संचालक अजय मोहनकर, गजानन बादशहा, सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी महेश हजारे, रोहित चौकडे उपस्थित होते. या कार्यक्रमात मत्स्यव्यवसाय करणाऱ्या समाज बांधवांना जागतिक मत्स्य दिवसाचे महत्व सांगण्यात **आले.**

## देवरी येथे आशा वर्कर आणि गटप्रवर्तक यांची भाऊबीज साजरी



**देवरी:–** देवरी–आमगाव विधानसभा क्षेत्रातील आशावर्कर आणि गट प्रवर्तक यांनी आमदार सहसराम कोरोटे यांचेसह भाऊबीज काल सोमवारी (दि.२०) भाऊबीज मोठ्या उत्साहात साजरी केली.

स्थानिक कोरोटे भवन येथे आयोजित या भाऊबीज कार्यक्रमाचे केंद्रस्थानी आमगाव–देवरी विधानसभेचे आमदार सहसराम कोरोटे हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून गोंदिया जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष उषा मेंढे, देवरी तालुका महिला काँग्रेस अध्यक्ष सुनंदा बहेकार, जि.प. सदस्य विमल कटरे, छबु उके, छाया नागपुरे, सालेकसा पंचायत समिती सभापती प्रमिला गणवीर, सालेकसा पंचयात समिती सदस्य वीणा कटरे, देवरी पंचायत समिती सदस्य भारती सलामे, अनुसया सलामे, सामाजिक कार्यकर्त्या सीमा कोरोटे, मुल्लाच्या सरपंच कल्पना बागडे, देवरीच्या नगरसेविका सुनीता साहू, मोहन डोंगरे, शकील कुरेशी, कल्पना डोंगरे, शालू कुथे जिल्हा सचिव आशा वर्कर, उत्तम मरकाम, होसलाल रहागडले, दिपक(राजा) कोरोटे, शेखर कनोजिया, छाया मडावी,अनवंता आचले, संदीप महोबिया, कुलदिप गुप्ता, प्रशांत कोटांगले, प्रदीप देशमुख, बळीराम कोटवार, संदीप भाटिया आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी आमदार कोरोटे यांनी आशावर्कर आणि गट प्रवर्तक यांना साडी व मिठाई देऊन सत्कार केला. कार्यक्रमाचे संचलन माजी पंचायत समिती सदस्य ओमराज बहेकार यांनी केले.

# वलयांकित वाघ नेमके गेले कुठे?; मृत्यू की शिकार हे गुलदस्त्यात

**वाघांची प्रसिद्धी करणे हेच चुकीचे आहे. प्रसिद्धी करायचीच असेल तर अशा वाघांच्या देखरेखीसाठी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. या वाघांचा अधिवास पूर्णवेळ पर्यटनासाठी खुला न ठेवता काही काळासाठी तो बंद ठेवायला हवा. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या नियमांचे पालन व्हायला हवे. अन्यथा, वाघांचे बेपत्ता होणे थांबणार नाही.**

**यादव तरटे पाटील, माजी सदस्य, राज्य वन्यजीव मंडळ.**

**नागपूर :** महाराष्ट्रातील वाघांनी जागतिक पातळीवर आपली विशेष ओळख निर्माण करुन वनखात्याला भरघोस महसूल मिळवून दिला. मात्र, नंतर हे वाघ लुप्त झाले. त्यांचा मृत्यू झाला की कसे, याबाबत वन खात्याच्या दरबारी नोंदच नाही. तीन हजारांहून अधिक किलोमीटरचा प्रवास करणारा “वॉकर’, अवघ्या पावणेदोन वर्षांचा असताना रानगव्याची शिकार करणारा “जय’ कळमेश्वरच्या राखीव जंगलातील “नवाब’आणि आता ताडोबाची राणी “माया’, असे हे दुर्दैवी वर्तुळ आहे.

वाघांना त्याचे आयुष्य नैसर्गिकरित्या जगू न देता त्यांची सतत प्रसिद्धी करत राहणे, हेच वाघांसाठी धोकादायक ठरत असल्याचे महाराष्ट्रातील अलीकडच्या काही घटनांवरुन स्पष्ट झाले आहे. वाघांच्या नावावर अर्थकारण, रिसॉर्टचालक, पर्यटक मार्गदर्शक असे सारेच त्यासाठी जबाबदार आहेत. वाघांना त्यांच्या नोंदणीकृत नावांऐवजी विशेष नामकरण केलेल्या नावाने ओळख देण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यावर अंकुश लावण्यात खात्यालाही अपयश आले. परिणामी, पर्यटकांचा ओढा या वलयांकित वाघांकडेच अधिक राहिला. त्यामुळे अतिपर्यटन या वाघांना त्यांचा अधिवास सोडण्यास भाग पाडत नाही ना, असा प्रश्न वन्यजीव प्रेमींकडून विचारला जात आहे.

### “वॉकर’

यवतमाळ जिल्ह्यातील टिपेश्वर अभयारण्यातील या वाघाने १४ महिन्यांत ३ हजार १७ किलोमीटरचा प्रवास केला. औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा आणि तेलंगणजवळील अदिलाबादपर्यंत त्याची मुशाफिरी होती. मार्च २०२० ला त्याच्या रेडिओ कॉलरची बॅटरी संपली. बुलढाणा जिल्ह्यातील ज्ञानगंगा अभयारण्य त्याचे शेवटचे ठिकाण होते.

### “जय’

नागझिरा अभयारण्यात “माई’ या वाघिणीच्या पोटी जन्मलेल्या “जय’ या वाघाने अवघ्या पावणेदोन वर्षांचा असताना याच अभयारण्यात रानगव्याची शिकार केली. त्यानंतर तो उमरेड–कऱ्हांडला अभयारण्यात स्थलांतरित झाला. “जय’ कधीही शिकाऱ्यांच्या तावडीत सापडू शकतो, यासाठी लाखो रुपये खर्चून त्याला “सॅटेलाइट रेडिओ कॉलर’ लावण्यात आले. एप्रिल २०१६ पासून त्याचा पत्ताच लागलेला नाही.



### “नवाब’

कळमेश्वर–कोंढाळी राखीव जंगलातील वाघाने “नवाब’ म्हणून ओळख निर्माण केली. या वाघाने दोन वर्षे सहा महिन्यांचा असताना स्थलांतर केले. सुमारे १०० ते १२० किलोमीटरचे अंतर पार करुन अमरावती जिल्ह्यमतील पोहरा–मालखेडच्या राखीव जंगलात तो पोहरा–मालखेडचा “राजा’ झाला. मात्र, सध्या त्याच्या अस्तित्वाची कल्पना कुणालाही नाही.

### “माया’

पांढरपौनी भागात आपल्या बछडयांसह भटकणारी “माया’ ही वाघीण पर्यटकांना कधीच निराश करीत नाही आणि म्हणूनच ताडोबाची राणी अशीही तिची ओळख. १३ वर्षांच्या मायाने पाचवेळा बछडयांना जन्म दिला आणि ती सातत्याने बछडयांसोबत दिसून आली. ताडोबा व्याघ्र प्रकल्पातील माया जगप्रसिद्ध असून तिचे लाखो चाहते आहेत. ऑगस्ट २०२३ पासून ती बेपत्ता आहे.



# अद्भुत जातं

“असं जातं चांगलं तर सोजी तरी दळू गं बाई.”

इयत्ता पाचवीच्या ‘माहेर’ या सदाशिव माळी रचित कवितेतील या काव्यपंक्तीतून जात्याभोवतीचं मानवी मनाचं भावविश्व उत्कटपणे व्यक्त होते. आधुनिक तंत्रज्ञानाचा पसारा येण्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या उखळ–मुसळ, पाटा–वरवंटा, जातं अशा कित्येक नित्योपयोगी साधनांचे मानवी मनाशी असलेले अनुबंध साहित्यातून रेखाटलेले दिसतात. आधुनिकीकरणानं अनेक प्रकारची जुनी समाजोपयोगी साधनं पुढे सरकत्या काळासोबत विस्मृतीत जात असतात आणि नवीन पिढीला त्याबद्दल मग माहिती असणे दुरापास्त होते. माणसाच्या श्रमाचे सुलभीकरण करण्यात ज्या साध्या यांत्रिक साधनांचा अमूल्य वाटा राहिलेला आहे, अशी जुनी यंत्रं खरं तर मानवी समाजाचा सांस्कृतिक वारसा समजला जातो, असतो. जातं!...चक्कीसारखं दैनंदिन गरजेचं दळणाचं हे साधन. पिठगिरणी येण्याच्या आधी याचा सर्रास वापर असायचा. घरोघरी जातं असायचं. पण चक्की जशी सार्वजनिक असते, तसं सार्वजनिक जातं वानगीदाखल बघायला मिळालं तर...!

होय, असंच एक भलं मोठं जातं अकल्पितपणे पहायला मिळाले. कामठी तालुका, मौजे निंभा, ग्रामपंचायत निवडणूक कर्तव्य असल्याने येथे जाण्याचा प्रसंग. येथील शाळेच्या इमारतीत निवडणूक केंद्र असल्याने मुक्काम होता. त्या ठिकाणी पोहचल्यावर मतदान केंद्राची रचना आणि मतदानासाठी संपूर्ण तयारी करुन शाळेच्या परिसरात फेरफटका मारत असताना जातं दिसलं, शाळेच्या प्रांगणात पश्चिममुखी इमारतीच्या समोरच्या उजव्या कोपऱ्यात हे भलं मोठं जातं आपलं बस्तान मांडून आहे. जात्याच्या दोन्ही तळ्या आहेत. खालची तळी जमिनीत बसलेली असल्याने दिसत नाही एका बाजूने जराशीच उघडी दिसते. वरची तळी पूर्णपणे दृश्य आहे. या जात्याची त्रिज्या सुमारे साडेतीन–चार फुटाची आहे. त्याप्रमाणे जात्याचं मुखही अघळपघळ आणि मुखावरील काठ जाडजूड ओठासारखे. वरच्या तळीची जाडी सुमारे एक फूट असावी तर खालची तळी त्यापेक्षाही अधिक जाडजूड. वरच्या तळीला दोन जागी खुंटीसाठी वर्तुळाकार खोल खड्डे समोरासमोर असून बाणाच्या टोकाच्या आकाराचे आणखी दोन खड्डे दिसतात.(ह्या दोन खड्ड्याचं औचित्य ध्यानात येत नाही). एवढं मोठं जातं एकट्या दुकट्या स्त्रीने अथवा पुरुषाने फिरवणे अशक्यच. म्हणून तेल काढण्याच्या घाण्याला बैल जुंपून घाणा फिरवला जात, तसाच खुंटीला बैल जुंपून हे जातं फिरवलं जात.

अख्खं निंभा गाव व परिसरातील काही गावचे लोक येथे दळण दळण्यासाठी येत. निंभा गावातील सभोवती गोळा झालेले पुरखे माहिती सांगत होते. शाळेच्या कडेला मारुती मंदिर आहे. त्या मंदिराच्या पुढ्यात एक मोठं झाड होतं त्या झाडाखाली हे जातं होतं. मंदिराच्या बांधकामावेळी ते हलवण्यात आले. पिठगिरणी येण्यापूर्वी हे जातंच पिठगिरणी सारखं समाजोपयोगी होत. अनेक लोक हे अद्भूत जातं पाहून गेले. वस्तुसंग्रहालय, पुरातत्व विभागाचे मान्यवर यांनी हे जातं नेऊ देण्याची मागणी केली. पण गावकऱ्यांनी जातं नेऊ दिलं नाही.

जगण्यासाठी पिठ देणाऱ्या जात्याबद्दलची केवढी अगाध कृतज्ञता. पिठावर जगले, मिठ जागलं. दळण दळताना जात्यावरच्या ओव्या–लोकगितांतून श्रमपरिहारासोबतच जात्यातून येणाऱ्या संस्कारित पिठाप्रमाणे लोकसंस्कृतीचा झुळझुळ वाहणारा झरा निरंतर प्रवाही ठेवला. असं जातं, अद्भूत जातं आपल्या गावाचा वारसा, समाजाजीवनाचा अभिन्न घटक आपल्या लोकसंस्कृतीवर निस्सिम प्रित असलेल्या सज्जनांनी जतन करुन ठेवला. ग्रामीण भागात घरगुती जातं सर्रास पहायला मिळतात, पण हे दुर्मिळ अद्भूत जातं निंभा गावातच बघता आले.

**अनुज हुलके**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# २१२४ शेतकऱ्यांचा कीटकनाशकांना "बायबाय"

## एक हजार हेक्टरवर प्रयोग, खर्चात बचत होऊनही उत्पन्नही भरघोष



**गोंदिया:** पर्यावरण, आरोग्य आणि आर्थिकदृष्ट्या भविष्यकाळात सेंद्रीय शेतीचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे. रासायनिक खतांच्या अतिरेकी वापरामुळे मानवी आरोग्यासह जमिनीवर होणारे दुष्टपरिणाम लक्षात घेता यंदाच्या खरीप हंगामात आठही तालुक्यातील २१२४ शेतकऱ्यांनी तब्बल एक हजार हेक्टरवर संेद्रीय पद्धतीने धानाची लागवड केली. त्यांच्या प्रयोगाला यश आले असून भरघोष पिक कमी खर्चात त्यांनी घेतले. सेंद्रीय तांदळाला दर देखील जास्त मिळणार असून विषमुक्त खाद्यान्नामुळे नागरिकांचे आरोग्य सांभाळण्यात देखील त्या शेतकऱ्यांची महत्वाची भूमिका असणार आहे.

सेंद्रीय शेतीचा अवलंब केल्याने जमिनीची सुपिकता वाढते तसेच पिकासाठी केलेल्या सिंचनाचा कालावधी देखील वाढतो. तर दुसरीकडे कीटकनाशक आणि खतांच्या आवाजवी वापरामुळे जमिनीचा पोत बिघडून ते उत्पन्न खाल्ल्याने नागरिकांच्या जीवनमानावर परिणाम होते. सेंद्रीय शेतीमुळे कमी खर्चात भरघोष उत्पन्नाची हमी मिळत असून जमीन देखील सुपीक ठेवण्यास मदत होते. या पद्धतीचा वापर केल्यामुळे जमिनीची पाणी धारण डमता वाढून पाण्याच्या बाष्पीभवनाच्या प्रमाणात देखील कमालीची घट येते. सर्वात महत्वाचे म्हणजे रासायनिक खते आणि कीटकनाशकांमुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत असून तो रोखण्यात देखील मदत होते. या सर्व बाबींची जनजागृती कृषी विभागाच्या माध्यमातून गावागावात कृषी मेळावे आयोजित करुन देण्यात आली. त्यामुळे आता शेतकरी सेंद्रीय शेतीकडे वळू लागले आहेत. चालू खरीप हंगामात जिल्ह्यातील २१२४ शेतकऱ्यांनी आपल्या एक हजार हेक्टर शेतात सेंद्रीय पद्धतीने धान पिकाची लागवड केली.

कृषी विभागाच्या कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांनी मोठी मेहनत घेतली. गावागावात जावून शेतकऱ्यांचे गट तयार करण्यात आले. तया गटांना सेंद्रीय शेतीचे महत्व पटवून देण्यात आले. त्यामुळे जिल्ह्यातील ५१ गट सेंद्रीय शेतीकडे आकर्षित झाले. त्यांनी सेंद्रीय शेतीचा प्रयोग करण्यास पसंती दिली. विषमुक्त शेतीचा हा प्रयोग गोंदिया जिल्ह्यात देखील यशस्वी झाला आहे. दरवर्षी सेंद्रीय शेती करणाऱ्या शेतकरी आणि शेतकरी गटांत वाढ होत आहे. या प्रयोगामुळे तांदळाचे कोठार म्हणून ओळखण्यात येणाऱ्या गोंदिया जिल्ह्यातील नेहमी कर्जात बुडालेल्या शेतकऱ्यांना शास्वत उत्पन्न मिळण्याचा यशाचा मार्ग गवसण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्या गटांनी सेंद्रीय शेतीचा प्रयोग केला ते आता आपल्या यशाचा मार्ग इतर शेतकऱ्यांना देखील सांगून सेंद्रीय पद्धतीच्या लागवडीचा प्रचार आणि प्रसार देखील करत आहेत. आमगाव तालुक्यातील ननसरी, किकरीपार ही गावे सेंद्रीय शेतीसाठी प्रसिद्ध आहेत. तेथील शेतीला भेट देण्याकरिता शेतकरी मोठ्या संख्येने जावून सेंद्रीय लागवड आणि पद्धती याची माहिती घेत आहेत.

# बिरसीतून विमान उड्डाणाचे सुरु झाले काऊंटडाऊन

## इंडिगो कंपनीकडून प्रात्याक्षिक:नॉन शेडयूल ऑपरेशन पूर्ण

**गोंदिया:** बिरसी विमानतळावरुन येत्या १ डिसेंबरपासून प्रवासी विमानसेवा सुरु होणार आहे. त्याकरिताची तयारी जोमात सुरु आहे. इंडिगो कंपनी व्यवस्थापनाकडून नॉन शेडयूल ऑपरेशन पूर्ण करण्यात आले आहे. नुकतेच अचानक ७२ आसनी इंडिगो विमानात खासदार प्रफुल्ल पटेल आपल्या ५२ पाहुण्यांसह विमानतळावर पोहोचले. त्यामुळे विमानतळावरील अधिकाऱ्यांची धांदेल उडाल्याचे दिसून आले. उड्डाणाला अगदी काही दिवस शिल्लक असल्याने इंडिगो कंपनीकडून प्रत्येक बाबींची पूर्तता करण्यात येत आहे. १ डिसेंबरपासून बिरसी विमानतळावरुन पुन्हा हवाई सेवा सुरु होत आहे. यावेळी इंडिगो कंपनी बिरसी विमानतळावरुन आपली सेवा देणार आहे. या मार्गावर ७२ आसनी विमाने चालविण्यात येणार आहेत. विदर्भातील नागपूरनंतर गोंदियाच्या बिरसी विमानतळाला नागरी विमान वाहतूक महासंचालकांकडून व्यावसायीक उड्डाणंचा परवाना मिळाला आहे. ५ नोव्हेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विमान येथे उतरले होते. येथून ते मध्यप्रदेश आणि छत्तीसगडमध्ये निवडणूक प्रचारासाठी गेले होते. या प्रयोगामुळे विमानतळाला चांगले दिवस येण्याची आशा वाढली आहे.



**इंडिगोचे काऊंटर झाले तयार**

**विमानतळावरील इंडिगो कंपनीचे तिकीट काऊंटरही जवळपास तयार आहे. इंडिगोला त्यांच्या पसंतीची जागा देण्यात आली आहे. इंडिगो सारख्या कंपनीने देश-विदेशातील हवाई प्रवाशांचा हवाई सेवेवर मोठा विश्वास संपादन केला आहे. त्यामुळे गोंदियातील बिरसी विमानतळावरुन इंडिगोची विमानेसवा उपलब्ध झाल्याने विमान प्रवासाची सुखद अनुभूती प्रवाशांमध्ये आहे.**

इंडिगोचे विमान येथे उतरताच बिरसी विमानतळावर खळबळ उडाली. माजी केंद्रीय मंत्री आणि खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या इंडिगोच्या ७२ आसनी चार्टर विमानात ५२ पाहुणे होते. या पाहुण्यांना घेऊन इंडिगो विमान हैदराबादहून गोंदियाला पोहोचले. या कालावधीत इंडिगोने नॉन-शेड्युल्ड ऑपरेशन यशस्वीपणे पूर्ण केल्या. यावेळी इंडिगोचे अधिकारी, कर्मचारी व विमानतळ प्रशासन उपस्थित होते. १ डिसेंबर रोजी विमानसेवेच्या पहिल्या दिवशी तिरुपती-हैदराबाद येथून उड्डाण केल्यानंतर विमान बिरसी विमानतळावर उतरणार असून बिरसी येथून तेच विमान हैदराबाद अणि तिरुपतीला जाणार असल्याने संपूर्ण परिसरात प्रचंड उत्साह आणि आनंदाचे वातावरण आहे. बिरसी विमानतळाचे संचालक शफिक शाह यांनी सांगितले की, विमानतळावरुन प्रवासी विमानसेवा पुन्हा सुरु करण्यासाठी सर्व तयारी अंतिम टप्प्यात आली असून प्रशासन यासाठी पूर्णपणे सज्ज आहे.

# १० टन कचऱ्यात निघते रोज ८० किलो प्लास्टिक

## वाढली पालिकेची डोकेदुखी: प्रक्रिया प्रकल्प नसल्याने अडचण

**गोंदिया:** व्यवस्थापन प्रकल्प नसल्यामुळे या कचऱ्याचे करावे काय, अशी अडचण निर्माण झाली आहे. शहरातून दररोज सुमारे ५० टन कचरा संकलित केला जातो. या संकलित कचऱ्यात १५ ते २० टन सुका कचरा असतो. या सुक्या कचऱ्यात दररोज सरासरी ८० किलो प्लास्टिक असते. असे स्वच्छता कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. बाजारपेठेतील दुकानदार तसेच किरकोळ विक्रेत्यांकडून पन्नास मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांची सर्रात विक्री व वापर केला जात आहे. संबंधित दुकानदार तसेच विक्रेत्यावर नियमित कारवाई होत नसल्याने प्लास्टिक वापर व विक्रीच्या प्रमाणात वाढ झाली आहे. शहरात शंभराहून अधिक हॉटेल्स, चायनीज, वडापाव विक्रेते तसेच कापड दुकानदार, भांडीविक्री करणारे व्यापारी व व्यावसायीक आहेत. त्यांच्याकडूनही मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पिशव्यांचा वापर केला जात आहे. पालिकेकडे कचरा व्यवस्थापन प्रकल्प नाही. त्याच्याकरिता आठ वर्षांपासून निधी येऊन देखील जागा मिळत नसल्याने कचराकोंडी होत आहे.



**जाळले तर प्रदुषण, साठवले तर कचरा**

**प्लास्टिक हा असा पदार्थ आहे की, तो पुरला तरी नष्ट होऊ शकत नाही. जाळला तर हवेचे प्रदुषण होते. त्यातून गंभीर आजारही होण्याची भीती असते. तसेच तो साठवून ठेवला तर त्यापासून दुर्गंधी व इतर आजारही होऊ शकतात. प्लास्टिकच्या वापरामुळे पर्यावरणावर गंभीर दुष्टपरिणाम होत आहे. प्लास्टिक पिशव्यांची पहिली समस्या म्हणजे व पिशव्यांचे विपटन होत नाही. पिशवीचे पूर्णपणे विघटन होण्यासाठी चारशे ते पाचशे वर्षाचा कालावधी लागतो. आज पिशवी फेकली तरी पुढच्या चार ते पाच पिढयांच्या त्याचा त्रास होऊ शकतो.**

सध्या गोरेगाव तालुक्यातील हिरडामाली येथील व्यवस्थापन प्रकल्पात कचरा पाठविण्यात येत आहे. मात्र दोन दिवसांपुर्वी हिरडामाली येथील नागरिकांनी गोंदियाच्या कचऱ्याला विरोध केला. त्यामुळे आता पुन्हा पालिकेची होकेदुखी वाढली आहे. शहरातून दिवसाला निघणाऱ्या ५० टन कचऱ्यापैकी तब्बल ८० किलो कचरा प्लॉस्टिकचा असल्याने प्लास्टिकबंदी असताना ते प्लॉस्टिक येते कुठून असा सवाल देखील उपस्थित होत आहे.

# आरोपीला रावणवाडीतून अटक; कौटुंबिक वादाचा थरारक अंत

**गोंदिया:** तालुक्यातील रावणवाडी येथील रहिवासी दाम्पत्यातील कौटुंबिक वादाचा थरारक अंत झाला. हे दाम्पत्य रोजगाराच्या शोधात नागपूरला गेले होते. तेथे पतीने पत्नीची हत्या करून तिचा मृतदेह हिंगणा पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या समृद्धी महामार्गाजवळील जंगलात फेकून दिला होता. या हत्याकांडाचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले आहे. हिंगणा पोलिसांनी सोमवारी रावणवाडीतून आरोपीला अटक केली.देवराम पटले (४५, रा. रावणवाडी, गोंदिया, ह.मु. हिंगणा- नागपूर), असे आरोपी पतीचे तर सायत्रा देवराम पटले (४२), असे मृत पत्नीचे नाव आहे. देवरामने १४ नोव्हेंबर रोजी पत्नी सायत्राची हत्या करून तिचा मृतदेह समृद्धी महामार्गाजवळील जंगलात फेकून दिला होता. यानंतर १४ नोव्हेंबरला देवरामने सायत्रा बेपत्ता झाल्याची माहिती नातेवाईकांना दिली. याबाबत देवरामने नागपूर पोलिसांत पत्नी हरवल्याची तक्रारही दाखल केली.तक्रार

# फेसबुकवर मैत्री महागात; मेकॅनिकल इंजिनीअरला तब्बल १८ लाखांचा गंडा, वाचा नेमकं काय घडलं?

**गोंदिया:** फेसबुकवर झालेल्या मैत्रीतून विश्वास ठेवत शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतविणाऱ्या मेकॅनिकल इंजिनीअरला तब्बल १८ लाख १९ हजार ४४ रुपये गमवावे लागले. फेकचंद नकटू पटले (३७, रा. ठाणेगाव, ता. तिरोडा) असे फसवणूक झालेल्या इंजिनीअरचे नाव असून वर्धनराज एस. (रा. अशोकनगर, चेन्नई) असे आरोपीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ठाणेगाव येथील फेकचंद नकटू पटले हे तरुण ओमान येथे मागील १४ वर्षांपासून मेकॅनिकल इंजिनीअर म्हणून कार्यरत आहेत. सुट्टीदरम्यान ते गावी येत असतात. ओमान येथे असताना फेसबुकवर ते वर्धराजनच्या निफ्टी बॅकनिफ्टी पोस्ट बघायचे. त्यानुसार २९ नोव्हेंबर २०२१ रोजी पटले यांनी वर्धराजन याला फेसबुकवर संदेश पाठवित गुंतवणुकीशी संबंधीत माहिती व्हॉट्सॲपवर विचारली. वर्धराजनने "तुम्ही मला तुमचे डीमॅट अकाउंट वापरू दिल्यास तुम्हाला स्टॉक मार्केटमध्ये भरपूर फायदा करुन देऊ शकतो' असे आमिष दिले.

तसेच होणाऱ्या लाभातील १० टक्के वर्धराजन यांच्या अकाऊंटवर टाकण्याचे तसेच जर कॅपिटल रकमेचे नुकसान झाल्यास ती रक्कम प्राप्त झाल्यावर होणाऱ्या नफ्याचे ३० टक्के वर्धराजन यांना देण्याचे दोघांत ठरले. त्यानुसार, फेकचंद पटले यांना नफा मिळवून देण्याचे आमिष देत वर्धराजन याने त्यांची तब्बल १८ लाख १९ हजार ४४ रुपयांनी फसवणूक केली. या घटनेसंदर्भात तिरोडा पोलिसांनी भादंवि कलम ४२० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. ठाणेगाव येथील फेकचंद पटले यांना आरोपी वर्धराजन याने "तुमचे डिमॅट अकाऊंटचे अधिकार द्या, नफा मिळवून देतो' असे म्हटले होते. यावर पटले यांनी



झेरोधा डिमॅट अकाऊंटचे सगळे अधिकार त्याला दिले. ९ नोव्हेंबर २०२१ रोजी १९९९ रुपये भरून फेकचंद पटले यांनी त्याच्या कंपनीत सदस्यत्व मिळविले वर्धराजन याला यूजर अकांऊट, पासवर्ड, पिननंबर व्हॉटसॲपवर पाठविले होते. वर्धराजन याने २ डिसेंबर २०२१ रोजी झेरोधा डिमॅट अकाऊंटवरुन १७ लाख ९९ हजार ६१५ रुपयांची ट्रेडिंग केली. त्या दिवशी वर्धराजन हा १७ लाख ७७ हजार ७४४ रुपयांनी तोट्यात गेला. परंतु, त्याचवेळी वर्धराजनने ५ लाख ४५ हजार ७०४ रुपये नफा झाल्याचा स्टेटस ठेवला होता. त्या स्टेटसचा स्क्रीन शॉट वर्धराजनला पाठवित पटले यांनी विचारणा केली असता "मी ऑफिसमध्ये नव्हतो. ऑफिसच्या मुलाला निफ्टी सीई बाय करायला सांगितले होते. मात्र, त्याने निफ्टी पे बाय केल्याचे सांगत नुकसान झाल्याचे म्हटले.

# संगणक परिचालकांचे कामबंद आंदोलन; ग्रा.पं.चे कामकाज प्रभावित



**गोंदिया:** महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत संगणक परिचालक संघटनेच्यावतीने २० नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील सर्वच तालुक्याच्या ठिकाणी विविध मागण्यांना घेवून काही ठिकाणी एक दिवसीय तर काही ठिकाणी बेमुदत कामबंद आंदोलनाला सुरुवात करण्यात आली आहे. यामुळे ग्रामपंचायतीतील ऑनलाईन व ऑफलाईन असे सर्व प्रकारच्या कामकाज प्रभावित झाले आहे.

जिल्ह्यात १३ वर्षांपुर्वी जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये संगणक परिचालक यांची नियुक्ती सीएससी,एसपीव्ही या कंपनीमार्फत करण्यात आली. या कंपनीच्या माध्यमातूनच त्यांना मानधन देण्यात येत असे. कंपनीच्यावतीने संगणक परिचालकांचे मानधन १२ हजार रुपये ठरविण्यात आले. ते पैसे कंपनी जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाला वळती करत असे व त्यानंतर विभागाच्या माध्यमातून संगणक परिचालकांना मानधन देण्यात येतो. मात्र मागील काही वर्षांपासून संगणक परिचालकांना ६ हजार ९३० रुपयेच मानधन देण्यात येते, ते ही वेळेवर देण्यात येत नाही. या शिवाय ग्रामपंचायतीतील अतिरिक्त कामांचा बोजाही संगणक परिचालकांवर थोपला जात आहे. परिणामी ठरलेले मानधन देण्यात यावे तसेच अतिरिक्त कामाचा बोझा कमी करण्यात यावा, परिचालकांना सेवेत कायम करण्यात यावे यासाठी अनेक वेळा जिल्हा प्रशासनासह राज्य शासनाला निवेदन देण्यात आले. मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्याने जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात संगणक परिचालकांनी आंदोलनाची भूमिका घेतली आहे. तिरोडा येथे संगणक परिचालकांनी बेमुदत कामबंद आंदोलनाला सुरुवात केली आहे. तर सडक अर्जुनी येथे एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. तिरोडा येथे अध्यक्ष प्रकाश पटले, मनोहर हरिणखेडे, तुरेंद्र नागपुरे, टोलीराम नेरकर, प्रितीचंद टेंभरे, मनिष गजभिये, कैलाश केवट, विवेक पटले, मनिष गोखे, हसील धवडे, शैलेश साखरवाडे आदि उपस्थित होते. देवरी येथे तालुका अध्यक्ष कृष्णा ब्राम्हणकर, उपाध्यक्ष टीकेश राऊत, कोषाध्यक्ष सचिन धानगाये, सचिव रेवचंद खोटेले, अनिल भेंडारकर, कन्हैया सोनसर्वे, सुखदेव बोपचे, वैशाली डोमळे, भारती चौधरी तसेच तालुक्यातील ग्रामपंचायत संगणक परिचालक प्रामुख्याने उपस्थित होते.

### हिवाळी अधिवेशनात या घटनेची होणार पुनरावृत्ती ?

**नागपूर:** नागपूरमध्ये होणारें विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नेहमीच वेगवेगळ्या कारणांमुळे वादळी ठरते. कधी राजकीय आरोप - प्रत्यारोपांमुळे तर कधी पक्षातील फूट यासाठी कारणीभूत ठरते. यंदा सात डिसेंबरपासून नागपूरमध्ये अधिवेशनाला सुरूवात होत आहे. मागच्या अधिवेशन काळात शिवसेनेत फूट पडल्यावर विधिमंडळ परिसरातील कार्यालय ताब्यात घेण्यावरून वाद झाला होता. आता याच मुद्यावरून राष्ट्रवादीच्या दोन गटात संघर्ष होतो का? की यावर तोडगा काढला जातो याकडे लक्ष असणार आहे.

नागपूर विधानभवन परिसरात सर्व प्रमुख पक्षांसाठी कार्यालय दिले जातात. त्यात भाजप, काँग्रेस, सेना, राष्ट्रवादी व अन्य मान्यताप्राप्त पक्षांचा समावेश असतो. सेनेत फूट पडल्यावर दोन्ही गटांकडून कार्यालयावर दावा केला होता. अखेर गटाला जागा देण्यात आली होती. याचीच पुनरावृत्ती यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसबाबत घडण्याची शक्यता आहे.

कारण या पक्षातही फूट पडली आहे. दोन्ही गट त्यांचाच पक्ष अधिकृत असल्याचा दावा करीत असल्याने विधिमंडळ कार्यालयाचा ताबा कोणाकडे असणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. पक्ष आणि निवडणूक चिन्ह याबाबत निवडणूक आयोगाकडे सुनावणी सुरू आहे. अधिवेशनापूर्वी याचा निकाल आयोगाने दिल्यास वादावर तोडगा निघू शकतो.

# एटापल्ली तालुक्यातील वांगेतुरीत अवघ्या २४ तासात उभारले नवीन पोलिस स्टेशन

**गडचिरोली :** नक्षलदृष्ट्या अतिसंवेदनशील अशा दुर्गम-अतिदुर्गम भागातील आदिवासी बांधव विकासापासून कोसो दूर आहेत. त्यांच्या विकासासह माओवाद्यांच्या कारवायांना आळा घालण्यासाठी गडचिरोली पोलिस दलाने सोमवार, दि.२० रोजी हेडरी उपविभागांतर्गत येणाऱ्या वांगेतुरी या ठिकाणी नवीन पोलिस स्टेशनची स्थापना केली. पोलिस उपमहानिरिक्षक संदीप पाटील, पोलिस अधीक्षक नीलोत्पल आणि इतर पोलिस अधिकारी व ग्रामस्थांच्या उपस्थितीत उद्घाटन कार्यक्रम पार पडला.

सदर पोलिस स्टेशनची उभारणी करण्यासाठी गडचिरोली पोलिस दलाचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. तब्बल एक हजार सी-६० कमांडो, २५ बीडीडीएस टीम आणि ५०० विशेष पोलीस अधिकारी तथा नवनियुक्त पोलिस जवान यांनी खासगी कंत्राटदाराच्या मदतीने अवघ्या २४ तासात या नवीन पोलिस स्टेशनची उभारणी केल्याची माहिती पोलिस विभागाने दिली.

एकूण १५०० मनुष्यबळ, १० जेसीबी, १० ट्रेलर, ४ पोकलेन, ४५ ट्रक इत्यादीच्या सहायाने या पोलिस स्टेशनची उभारणी करण्यात आली. या पोलिस स्टेशनमध्ये वायफाय सुविधा, २० पोर्टा कॅबिन, जनरेटर शेड, पिण्याच्या पाण्यासाठी आरओ प्लँट, मोबाईल टॉवर, टॉयलेट सुविधा, पोस्ट सुरक्षेसाठी मॅक वॉल इत्यादींची उभारणी करण्यात आली. या ठिकाणी गडचिरोली पोलिस दलाचे ४ अधिकारी व ६३ अंमलदार, एसआरपीएफचे १ अधिकारी व ४२ अंमलदार, तसेच सीआरपीएफच्या १९१ बटालियनचे १ असिस्टंट कमांडन्ट व १ जी कंपनी, तसेच एका अधिका?्यासह १ यंग प्लाटुन तैनात करण्यात आली आहे.




**स्थानिक नागरिकांना विविध साहित्याचे वाटप**

**पोलिस स्टेशनच्या उद्घाटन कार्यक्रमा दरम्यान उपस्थित महिलांना सलवार सुट, नऊवारी साडी, पुरुषांना धोतर, लोअर पॅन्ट, चप्पल, ब्लॅकेट, चादर, टी-शर्ट, मुलींना सायकल, नोटबुक, फ्रॉक, कंपास, चॉकलेट्स, बिस्कीट, मुलांना क्रिकेट बॅट, बॉल, व्हॉलीबॉल नेट, व्हॉलीबॉल इत्यादी साहित्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमला सीआरपीएफचे कमान्डंट सत्यप्रकाश, अपर पोलिस अधीक्षक (अभियान) अनुज तारे, अपर पोलिस अधीक्षक (प्रशासन) कुमार चिंता, उपविभागीय पोलीस अधिकारी (हेडरी) बापुराव दडस, तसेच वांगेतुरीचे ठाण्याचे नवनियुक्त प्रभारी अधिकारी सपोनि महेश विधाते उपस्थित होते.**

वांगेतुरी पोलिस स्टेशन स्थापन झाल्याने त्या परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी वांगेतुरी, हेडरी, गट्टा जांबिया व संपूर्ण एटापल्ली तालुक्यात पुढील १५ दिवसांसाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४४ (जमावबंदी) लागू केली आहे.

# सृजन सामाजिक संस्थेतर्फे अनाथ मुलांसाठी ४५ हजारांची मदत

**गोंदिया:** पहांदी पारो कुपार लिंगो बहुउद्देशिय संस्थेच्या संस्थापिका प्रा. डॉ. सविता बेदरकर यांच्या पुढाकाराने आयोजित कोरोना एकल महिला, अनाथ मुलांसह दिवाळी मनोमिलन या सामाजिक कार्यक्रमाच्या निमित्ताने सृजन सामाजिक संस्थेने समाजातील दान दात्यांकडून आवाहनाद्वारे पंचेचाळीस हजार रुपये मदत गोळा करून डॉ. सविताताई बेदरकर यांना उपस्थित जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. रमेश राऊत व इतर दान दात्यांच्या हस्ते चेक सुपूर्द केला.

जन्मदात्यांचे छत्र हरविलेल्या अनाथ मुलांच्या व्यावहारिक जीवनात दिवाळीचा गोडवा निर्माण करण्याचे काम प्रा. सविता बेदरकर मागील काही वर्षांपासून दिवाळीच्या पर्वावर मनोमिलनाचा कार्यक्रम घेत असतात. यावर्षी डॉ. बेदरकर यांच्या निवासस्थानी हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून चंद्रपूर येथील ज्येष्ठ रंगकर्मी व मराठी चित्रपट बोर्डाच्या सदस्या जयश्री गावंडे (कापसे) उपस्थित होत्या.

यावेळी गोंदिया विधानसभा क्षेत्राचे लाडके आमदार यांच्या पत्नी सौ. सविता विनोद अग्रवाल, विशेष समाज कल्याण अधिकारी विनोद मोहतुरे, डायटचे प्राचार्य डॉ. रमेश राऊत, समाजशील सेवानिवृत्त शिक्षक अनिल मेश्राम, प्राचार्य माधुरी नासरे, साधनव्यक्ती वशिष्ठ खोब्रागडे, चोथराम गोपलानी, सीमा डोये, भगवान नंदागवळी, मधुसूदन दोनोडे, प्रमोद गुडधे, वंदना सेलोकर, शिक्षिका नाननबाई बिसेन, यशोधरा सोनेवाने, ममता पटले(येडे), केंद्रप्रमुख निशा बोदेले, कुमुद शहारे, नर्सिंग इंचार्ज सुनिता खोब्रागडे उपस्थित होत्या.



**यांनी केली मदत:** सृजन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विजय ठवरे, उपाध्यक्ष वशिष्ठ खोब्रागडे व सचिव वरुण खंगार यांच्या भावनिक आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देवून खालील मान्यवर दान दात्यांनी भरपूर आर्थिक मदत केली. ज्यात प्रामुख्याने चंद्रपूर चे डायट प्राचार्य तथा शिक्षणाधिकारी राजकुमार हिवारे, डायट गोंदियाचे प्राचार्य डॉ. रमेश राऊत, नर्सिंग ऑफिसर दिपलता तुरकर, सहा.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन कापसे , गोंदियाचे शिक्षणाधिकारी(प्राथ.) डॉ. महेंद्र गजभिये, गटशिक्षणाधिकारी विशाल डोंगरे, महेंद्र मोटघरे, साधनव्यक्ती कुमुदिनी घोडेस्वार, हिमकांता कटरे, सेवानिवृत्त शिक्षक एल. यु. खोब्रागडे, केंद्रप्रमुख निशा बोदेले, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख कुमुद शहारे, दिलीपसिंग परमार, आरोग्य भारती गोंदियाचे डॉ. प्रशांत कटरे, विशेष शिक्षिका दीपा बिसेन, शिक्षिका ममता पटले/येडे, योगिता संजय वानखेडे/ ढोरे, आदिवासी विकास विभाग संशोधन अधिकारी किशोर देशकर, डखव अभिकर्ता जोगेंद्र देशमुख, मुख्याध्यापक ए. टी. डुंबरे, शिक्षक संतोष कुंभारे, साधनव्यक्ती अनिता ठेंगडी, सुनील ठाकूर, ब्रजेश मिश्रा, रामू शेंदरे, उमेश भरणे, विजय कुमार लोथे, संजय मस्के, शिक्षक नरेंद्र गौतम, विनोद लिचडे, कु. प्रिया तिडके, गंगाधर चंद्रिकापुरे, दीपक रेवतकर, मंगेश रहमतकर, शालीकराम लीचडे, रोशन भैसारे, राहुल बिसने यांनी सहकार्य केले.

सर्व दान दात्यांचे सृजन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विजय ठवरे, उपाध्यक्ष वशिष्ठ खोब्रागडे व सचिव वरुण खंगार यांनी शतशः आभार व्यक्त केले आहे.


**नगर पंचायत कार्यालय, सडक अर्जुनी**

**तालुका-सडक अर्जुनी, जिल्हा गोंदिया**

निविदा सुचना क्र.८३५/बांधकाम/२०२३ दिनांक १७/११/२०२३

**निविदा सुचना**

सडक अर्जुनी नगर पंचायत बांधकाम विभागातर्फे नागरी सुविधा योजना सन २०१८-१९ व रस्ता अनुदान सन २०१७-१८ अंतर्गत नगरातील विविध कामांचे निविदा द्रि-लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहेत. सदरहू कामाचे निविदा फार्म/अटी व शर्ती नगर पंचायत कार्यालय सडक अर्जुनी येथून प्राप्त करता येतील. निविदेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**निविदा प्रसिद्धीचा तपशील**

| | |
|---|---|
| निविदा फार्म विक्री | दि.२०/११/२०२३ दुपारी १२.३० वाजेपासून |
| निविदा फार्म विक्री अंतिम दिनांक | दि.०४/१२/२०२३ सायं.५.०० वाजे पर्यंत |
| निविदा दाखल करण्याचा दिनांक | दि.२०/११/२०२३ दुपारी ३.०० वाजे पासून |
| निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | दि.०५/१२/२०२३ सायं.५.०० वाजेपर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक | दि.०६/१२/२०२३ दुपारी ३.०० वाजता (शक्य झाल्यास) |

**टिप:**१) निविदेसंबंधी कामाची सर्व आवश्यक माहिती नगर पंचायत सडक अर्जुनी कार्यालयाच्या बांधकाम विभागात उपलब्ध राहतील. २) निविदा संबंधित सर्व माहिती काळजीपूर्वक वाचुनच भरण्यात यावी. परिपूर्ण नसलेली निविदा स्विकृत केल्या जाणार नाही. ३)निविदेसंबंधी सर्वस्वी अधिकार मुख्याधिकारी,नगर पंचायत सडक अर्जुनी यांचेकडे राहतील.

-स्वा./- **श्री.तेजराम मडावी** अध्यक्ष
-स्वा./- **सौ.वंदना डोंगरवार** उपाध्यक्ष
-स्वा./- **श्री.अंकित भेंडारकर** बांधकाम सभापती
-स्वा./- **श्री.शरद हलमारे** मुख्याधिकारी

नगर पंचायत सडक अर्जुनी नगर पंचायत सडक अर्जुनी नगर पंचायत सडक अर्जुनी नगर पंचायत सडक अर्जुनी

# ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू देणार नाही, आमच्या वाट्याला याल तर याद राखा–छगन भुजबळ

## ओबीसी भटके विमुक्त आरक्षण बचाव एल्गार सभेत लाखो ओबीसी समाज बांधवांची उपस्थिती




**जालना:–** राज्यात बहुसंख्य असलेल्या ओबीसी समाजाच्या तुटपुंज्या आरक्षणात वाटेकरी तयार केले जात आहे मात्र आम्ही ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू देणार नाही. आमच्या वाट्याला याल तर याद राखा ओबीसींच्या महाएल्गार सभेतून राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी स्वयंघोषित नेत्यांवर घणाघात केला. ओबीसी भटके विमुक्त आरक्षण बचावासाठी तसेच या बांधवांच्या न्याय हक्कासाठी आज अंबड जि.जालना येथे राज्यातील ओबीसी नेत्यांच्या प्रमुख उपस्थितीत "ओबीसी भटके विमुक्त आरक्षण बचाव एल्गार सभा' पार पाडली. यावेळी ते बोलत होते. यावेळी लाखोंच्या संख्येने ओबीसी बांधव उपस्थित होते.

यावेळी राज्याचे विरोधीपक्षनेते विजय वडेट्टीवार, ओबीसी नेते प्रकाश शेंडगे, आमदार महादेव जानकर, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार आशिष देशमुख, आमदार देवयानी फरांदे, आमदार राजेश राठोड, ओबीसी महासंघाचे बबनराव तायवाडे, मुस्लीम ओबीसी संघटनेचे शब्बीर अन्सारी, माजी आमदार डॉ.नारायणराव मुंडे, प्रा.टी.पी.मुंडे, ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मणराव गायकवाड, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे मुंबई अध्यक्ष माजी खासदार समीर भुजबळ, माजी खासदार विकास महात्मे, सत्संग मुंडे, बळीराम खटके, डॉ.अभय जाधव, संदेश चव्हाण यांच्यासह सकल ओबीसी, भटके विमुक्त जाती, एसबीसी आणि अल्पसंख्याक समाज अंबड तालुका व जालना जिल्ह्यातील पदाधिकारी व ओबीसी बांधव लाखोंच्या संख्येने उपस्थित होते.

आरक्षण काय ते समजून घे आणि आम्हाला म्हणतो आरक्षण द्या आरक्षण द्या, असं म्हणत भुजबळांनी जरांगेंवर निशाणा साधला. मराठा तरुणांना मला सांगायचे आहे, या दगडाला शेंदूर लावून कोणता देव करायच आहे? त्याला आरक्षण कळेना, आरक्षण गरिबी हटावचा कार्यक्रम नाही, असं भुजबळ म्हणाले.

यावेळी मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन करत छगन भुजबळ म्हणाले की, आज या मंचावर बलदंड नेते बसले आहे मात्र आज स्व.गोपीनाथ मुंडे यांचासारखा आमचा महत्वाचा नेता नाही. आज स्व.गोपीनाथ मुंडे असते तर आपल्यावर संकटावर संकटे आली नसती. ज्या जालना जिल्ह्यात ही सभा होत आहे याच ठिकाणी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या मेळाव्यात मंडल आयोग लागू करण्याची मागणी केली. त्यानंतर मुख्यमंत्री शरद पवार साहेबांनी ओबीसी आरक्षण लागू केले. मा. पंतप्रधान व्ही.पी.सिंग यांनी मंडल आयोगाच्या शिफारशी स्विकारल्या व केंद्रात ओबीसी जातींना २७% आरक्षण दिले. त्याची अंमलबजावणी शरद पवार साहेबांनी केली असे त्यांनी यावेळी सांगितले.

ते म्हणाले की, मा.यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असताना त्यांनी न्या. बी.डी. देशमुख आयोग नेमला. त्यांनी ओबीसी प्रवर्गाला आरक्षण देण्याची शिफारस केली– शिफारस स्विकारुन राज्य सरकारने ओबीसी प्रवर्ग निर्माण केला व त्याला १०% टक्के व भटके विमुक्तांना ४ टक्के असे एकुण १४ % टक्के आरक्षण दिले गेले. त्यानुसार राज्यात २८३ बलुतेदार, अलुतेदार, कारू नारू जातीचा समावेश ओबीसीत करण्यात आला. १३ ऑगस्ट १९९० रोजी मा. पंतप्रधान व्ही.पी.सिंग यांनी मंडल आयोगाच्या शिफारशी स्विकारल्या व केंद्रात ओबीसी जातींना २७% आरक्षण दिले. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ७ न्यायाधिशांच्या घटनापीठाने मंडल आयोगाला मान्यता दिली. या न्यायमुर्तीमध्ये महाराष्ट्रातले थोर विचारवंत न्या. पी. बी. सावंत यांचा समावेश होता. महाराष्ट्रातल्या २०१ जातींना मंडल आयोगाने व राज्य सरकारने ओबीसीत घेतलेले असल्याने या २०१ जातींचा समावेश मा. सर्वोच्च न्यायालयाने घटनात्मकरित्या ओबीसीत केलेला आहे.

### टोपे–रोहित पवारांनी जरांगेंना आणून बसवलं

लाठीचार्ज झाल्यावर हे सरदार (मनोज जरांगे) घरात जाऊन बसले. आमचे राजेश टोपे साहेब आणि छोटे साहेब रोहित पवार यांनी त्याला (जरांगे) पहाटे तीन वाजता परत आणून बसवले. त्याला सांगितलं, शरद पवारसाहेब येणार आहेत. शरद पवारांना लाठीचार्ज का झाला, पोलिसांवर हल्ले कसे झाले हे सांगितलं नाही, असं भुजबळ म्हणाले.

ते म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा साहनी केस मध्ये दिलेल्या आदेशान्वये या २०१ जातींच्या व्यतिरिक्त कोणत्याही इतर जातीला ओबीसीत घालण्याचे तोवर राज्य व केंद्र सरकारला असलेले अधिकार राज्य व केंद्र सरकारकडून १६ नोव्हेंबर १९९२ रोजी काढून घेतले. ते आधिकार आयोगाकडे देण्यात आले. त्यानुसार राज्य सरकारने १९९३ पासून आजवर मा.न्या. खत्री आयोग, मा.न्या. बापट आयोग, मा.न्या. सराफ आयोग, मा. न्या. भाटीया आयोग, मा.न्या. म्हसे आयोग मा.न्या. गायकवाड आयोग यांची नियुक्ती केली. या आयोगांनी केलेल्या शिफारशीनुसार आजवर सुमारे ४१० जातींचा समावेश राज्याच्या ओबीसीत करण्यात आलेला आहे. इंद्रा साहनी खटल्यात मा. सर्वोच्च न्यायालयाने २७% ओबीसी आरक्षणाला मान्यता दिली. आता जे स्वयंघोषित नेते आरक्षणाची मागणी करत आहेत त्यांना आरक्षणाचा अभ्यास नाही अशी टीका त्यांनी केली.

ते म्हणाले की, काही लोक म्हणतात की मी दोन वर्ष तुरुंगात बेसन भाकर खाल्ली. त्यांना मी सांगतोय की होय मी खाल्ली, अगदी दिवाळीतही मी बेसन भाकर ठेचा कांदा खाल्ला पण तुमच्या सारखा सासऱ्याच्या घरी भाकरीचे तुकडे मोडत नाही अशी जहरी टीका त्यांनी केली. ते म्हणाले की, यांना कायद्याची काही माहिती नाही केवळ सकाळी उठायचे आणि काहीही बोलायचे असा प्रकार आहे. त्यामुळे मराठा तरुणांनी या शेंदूर लावलेल्या दगडाच्या मागे फिरू नये. हा महाराष्ट्र सर्व समाजाला सोबत घेऊन जाणारा महाराष्ट्र आहे. त्यासाठी अनेक नेत्यांनी योगदान दिल मात्र काही लोक जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याची टीका त्यांनी केली.

ते म्हणाले की, आरक्षण काही गरीब हटावचा कार्यक्रम नाही. मराठा आरक्षणाला आमचा विरोध नाही. मराठा आरक्षणासाठी राज्यात ५८ मोर्चे निघाले आम्ही विरोध केला नाही. ओबीसींना धक्का न लावता आरक्षण देण्यात याव यासाठी आपण सर्वप्रथम पाठींबा दिला. मात्र आम्ही कुणाची घर जाळली नाही आज काही आमदार कार्यकर्त्यांनी तर विरोधात भुमिका घेतलीच नाही तरी त्यांची घरे जाळली. कायद्याने आरक्षणाला आमचा विरोध नाही. मागच्या दाराने घुसण्याचा प्रयत्न करूनये अशी टीका त्यांनी केली.

> **एल्गार सभेत करण्यात आल्या विविध मागण्या**
>
> यावेळी ओबीसी प्रवर्गात मराठा समाजाचा समावेश करण्यात येऊ नये, बिहारच्या धर्तीवर महाराष्ट्रात ओबीसींची जात निहाय जनगणना करण्यात यावी, मराठा समाजाला देण्यात आलेली खोटी कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्यात यावी, खोटी बिंदू नामावली तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी, दि.७ सप्टेंबर २०२३ रोजी कुणबी सर्टिफिकेट देण्यासाठी शासनाने काढलेला जीआर ताबडतोब रद्द करावा यासह विविध मागण्या करण्यात आल्या.

ते म्हणाले की, उपोषण सुरु असतांना पोलिसांनी विनंती केली. त्यांची विनंती समजून न घेता त्यांच्यावर दगडफेक करण्यात आली. यामध्ये ७० हून अधिक पोलीस जखमी झाले. मात्र एकच बाजू सगळीकडे दाखविण्यात आली. ते पोलीस काय पाय घसरुन पडले काय? असा सवाल उपस्थित करुन ज्या महिला पोलिसांवर हल्ला झाला त्यांच्यावर जी परिस्थिती आली त्याची चौकशी व्हायला हवी. राज्याच्या पुढे देशाच्या पुढे खर चित्र न येता पोलिसांना दोष देण्यात आला. पोलिसांवर होत असलेल्या अन्यायामुळे पोलिसांनी देखील बीड मध्ये बघ्याची भूमिका घेतली. त्यांनतर बीड मध्ये आंदोलकांनी कोयते, चॉपर, पेट्रोल बॉम्ब घेऊन आमदार व ओबीसी पदाधिकाऱ्यांच्या घरांवर हल्ले करुन त्यांच्या मालमत्तेच प्रचंड नुकसान करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, निजाम राज्यातील नोंदी शोधून त्याला आरक्षण देण्याचा आमचा विरोध नव्हता. पहिल्यांदा पण ५ हजार, २० हजार, नंतर १३ हजार आता ५० हजार ६० हजार अशा नोंदी सापडने संशयास्पद आहे. आता शालेय दाखल्यांवर चुकीच्या नोंदी केल्या जात असल्याची टीका केली. माढ्यात न्हावी समाज बांधवाने निवडणुकीत मतदान केल नाही म्हणून घर पटवून देण्यात आलं. सोलापूर मध्ये एक अपंग बांधवाचा संशयास्पद मृत्यू झाला. त्यावर पोलीस गप्प का असा सवाल करत या लोकशाही व्यवस्थेत हुकुमशाही, दादागिरी करू पाहणाऱ्यावर कारवाई करा, राज्यातील गावबंदी असलेले सर्व पोस्टर हटविण्यात यावे. तसेच पोलिसांनी निपक्षपाती भूमिका घेऊन काम कराव असे त्यांनी यावेळी सांगितले.

ते म्हणाले की आज राज्यात काय चालु आहे. पंढरपुरच्या विठ्ठलाच्या पुजेला अटकाव घातला जातो. पंढरपुरचा पांडुरंग देखील यांनी ताब्यात घेतला आहे का? त्यालाही जातीय बंधनात अडकविले का असा सवाल करुन भगवान पांडुरंग सर्व समाजाचा आहे. मला धमक्या दिल्या जात आहेत–माझ्या मतदारसंघात धमक्या दिल्या जात आहेत. गेल्या काही दिवसांपासुन या फुले–शाहु–आंबेडकरांच्या महाराष्ट्राचे वातावरण काही मंडळींनी प्रदुषित केले असल्याचे सांगत आपल्या न्याय हक्कासाठी आता गप्प बसायचे नाही, लढायचं, शांततेने उत्तर द्याव असे आवाहन त्यांनी उपस्थित बांधवांना केले.

ते म्हणाले की, मराठा समाजासाठी डॉ. पंजाबराव देशमुख वस्तिगृह व निर्वाह भत्ता योजनेंतर्गत ३ लाख ७९ हजार ३७३ विद्यार्थ्यांना १२९३ कोटी रुपयाचे वाटप करण्यात आले. सारथी संस्थेमार्फत विविध योजनांतर्गत मराठा समाजातील ४६ हजार ३०९ विद्यार्थ्यांना १७२ कोटी रु. वितरीत करण्यात आले. अण्णासाहेब पाटील आर्थिकदृष्ट्या मागास विकास महामंडळाने वैयक्तिक व गट कर्ज व व्याज परतावा योजनेअंतर्गत ७० हजार लाभार्थ्यांना ५ हजार १६० कोटी रुपयांचे बँक कर्ज मंजूर केले आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळास प्रतिवर्षी ३०० कोटी याप्रमाणे निधी उपलब्ध करुन दिला जातो. राजश्री शाहू महाराज फ्रीशिप योजनेअंतर्गत १७ लाख ५४ हजार ४५९ विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी ९ हजार २६२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

विविध अभ्यासक्रमांच्या ३१ हजार प्रवेशांपैकी १०% एथड आरक्षणाखाली मराठा समाजातील ७८% विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने केलेल्या ६५० नियुक्त्यांपैकी ८५% नियुक्त्या मराठा समाजाच्या आहेत. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती आणि पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत मराठा समाजातील २ लाख १३ हजार ८६ विद्यार्थ्यांना एकूण १० हजार ५५७ कोटी रुपये देण्यात आले आहेत. मात्र आजवर ओबीसी महामंडळाला हजार कोटी देखील मिळाले नाही असा सवाल उपस्थित करत ओबीसींचा पण विचार करा अशी टीका त्यांनी केली.



# नागझिरा अभयारण्यात टी ४ वाघिणीचे बछड्यास एकत्र दर्शन

**गोंदिया :** नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या नागझिरा अभयारण्य परिसरात दिवाळीच्या सुट्यामध्ये आनंद घ्यायला आलेल्या पर्यटकांना ५ वाघांचे एकत्र दर्शन झाल्याने पर्यटक व इको गाईडमध्ये आनंदाची लाट पसरली आहे. शुक्रवारी सकाळी टी ४ वाघीण आणि तिचे ४ प्रौढ शावक मनसोक्त फिरत असल्याचे दिसल्यानंतर पर्यटकांची संख्या नक्कीच वाढेल, अशी अपेक्षा आहे. आठवडाभराच्या सुट्टीनंतर शुक्रवारी पर्यटन सुरू झाले आणि सकाळी पिटेझरी ते नागझिरा संकुलाकडे जाणाऱ्या बुधा बुधीजवळ टी ४ वाघीण आणि



तिची ४ पिल्ले आढळून आली. गोरेगाव तालुक्यातील मुंडीपार आणि गोरेगाव येथील पर्यटकांनी याचा व्हिडिओ बनवित सोशल मीडियावर प्रसारित केल्यानंतर वाघांच्या दर्शनाचा परिणाम सफारी बुकिंगवर दिसून आला. आणि महा इको टुरिझमची ऑनलाइन बुकिंग एका दिवसात फुल्ल झाली. चोरखमारा आणि पिटेझरी प्रवेशद्वारातून नागझिरामध्ये दाखल होणारया पर्यटकांची संख्या जास्त आहे.

नागपूर वरुन आलेल्या पर्यटक साक्षी डेकाटे यांनी सांगितले की,आम्ही पक्ष्यांच्या निरिक्षणासाठी आलो असताना एकाचवेळी टी ४ व टी ९ या वाघिणीचे बछड्यासह बघावयास मिळाल्याने आनंद झाल्याचे सांगितले.

पिटेझरी गेट येथील वनरक्षक डिलेश्वरी वाढई यांनी टी ४ वाघिण आपल्या बछड्यासह मुक्तसंचार करीत असल्याचे व्हिडीओ प्रसारीत झाल्यानंतर नागझिरा नवेगाव व्याघ्र प्रकल्पात व्याघ्र दर्शनाकरीता बुकींगला उत्तम प्रतिसाद दिवाळीच्या सुट्टीनंतर पहिल्यांदाच दिल्याचे सांगितले. पर्यटकांनी वाघिणीचे बछड्यासह दर्शनानंतर नागझिराप्रेमी पर्यटक व्याघ्र दर्शनासाठी आतूर झाले असून जिप्सी चालक व मार्गदर्शकांमध्ये आनंदाची लाट उसळली आहे.

## गोंदियाच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे बांधकाम सुरु करा,मुख्यमंत्र्यांना खा.पटेलांचे निवेदन

**गोंदिया :** गोंदिया येथे मंजूर झालेल्या व गेल्या सहा वर्षापासून सुरु असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम अद्यापही सुरु झालेले नसून ते त्वरीत सुरु करण्यात यावे.सोबतच गोंदिया येथे सुध्दा शासन आपल्या दारी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे यासबंधीचे खासदार प्रफुल पटले यांचे निवेदन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आज भंडारा येथे शासन आपल्या दारी या उपक्रमानिमित्ताने आले असता माजी आमदार राजेंद्र जैन यांनी दिले.



याप्रसंगी मुख्यमंत्र्यांशी विविध विषयांवर चर्चा करताना गोंदिया जिल्ह्यात शासन आपल्या द्वारी हा उपक्रम घेण्यात यावे. गोंदिया व भंडारा जिल्हयातील धान पिकाला पेरवा या रोगाने ग्रासल्याने धानाची उत्पादन क्षमता कमी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी, आधारभूत धान खरेदी केंद्र सुरू करणे, धानाला बोनस देणे, प्रलंबित सिंचनाच्या समस्या मार्गी लावण्यात याव्यात यासह जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्यांवर माजी आमदार राजेंद्र जैन यांनी मुख्यमंर्त्यांशी सकारात्मक चर्चा केली.

# जीवात जीव असेपर्यंत आरक्षणासाठी लढणार- विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार




जालना: ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागता कामा नये. ओबीसी समाजाचे आरक्षण टिकवणे सरकार आणि विरोधी पक्ष यांची सामूहिक जबाबदारी आहे. ओबीसींच्या हक्काचे रक्षण करण्याबरोबरच सर्व समाजाला न्याय देण्याचे काम आम्ही मिळून करू, जीवात जीव असेपर्यत ओबीसी समाजाच्या आरक्षणासाठी लढणार, असा विश्वास देत जातीनिहाय जनगणना झाली पाहिजे, अशी मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली. मंचावर ओबीसी नेते व मंत्री छगन भुजबळ, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, आमदार गोपीचंद पडळकर,रासप प्रमुख महादेव जानकर, आमदार राजेश राठोड, मुस्लिम ओबीसी मोर्चाचे नेते शबीर अन्सारी,माजी आमदार आशिष देशमुख,माजी आमदार नारायणराव मुंढे,ओबीसी जनमोर्चा राष्ट्रीय अध्यक्ष व ओबीसी नेते माजी आमदार प्रकाश शेंडगे,प्राध्यापक टी.पी. मुंडे आदी मान्यवर उपस्थित ते.

जालना जिल्ह्यातील अंबड येथे झालेल्या एल्गार सभेला संबोधित करताना श्री. वडेट्टीवार बोलत होते. यावेळी श्री. वडेट्टीवार भावूक झाले होते. श्री. वडेट्टीवार म्हणाले, आजची ही सभा पाहिल्यावर ओबीसींच्या हक्काला धक्का लावण्याची कोणाची हिंमत होणार नाही. ही ऐतिहासिक सभा आहे. ओबीसींच्या हक्कासाठी आम्ही लढत असताना कोणी धमक्या दिल्या तरी आम्ही लढत राहणार. पद येतील जातील. पद–पेक्षा समाजातील उपेक्षित वर्गाला न्याय देणे महत्वाचे आहे.

मराठा समाजाला ओबीसमधून सरसकट आरक्षण देऊ नयेत या मागणीसाठी जालना जिल्ह्यातील अंबड येथे सभा होत आहे. यावेळी, मनोज जरांगे यांनी बालहट्ट सोडा, आमच्या हातात कोयता आहे, असे म्हणत ओबीसी नेते आक्रमक होतांना पाहायला मिळत आहे. तर, "राज्यातील सर्व वंजारी समाज कोयता घेऊन, छगन भुजबळ आणि विजय वडेट्टीवार यांच्या मागे आहे. त्यामुळे, जरांगे जास्त बोलू नका, आमच्या हातात कोयता आहे. लक्षात ठेवा रात्र वैऱ्याची आहे. जरांगे नावच बाटूक आणि त्याच्या मागच्या लोकांना बघायचं आहे. त्यामुळे, भुजबळ यांच्या मागे ओबीसी समाज आहे," असं प्राध्यापक टी.पी.मुंडे म्हणाले आहेत.



ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यावेळी बोलतांना म्हणाले की, जरांगेंच्या सभेला तितक्यात तोला मोलाचं उत्तर दिलं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभा पाहावी, एका सभेवरती आम्ही थांबणार नाही. राज्यातील प्रत्येक ठिकाणी अशीच सभा होईल. जरांगे सभा मोठी झाली म्हणजे आरक्षण मिळत नसतं. भुजबळांकडे या तुम्हाला ते आरक्षणाचा मार्ग दाखवतील. एक भुजबळ तुम्ही पाडाल तर, १६० मराठे आम्ही पाडू, असा इशारा यावेळी शेंडगे यांनी दिला. भुजभळ म्हातारे झाले असले, तरी सिंह आहेत. भुजबळ साहेब तुम्ही आदेश द्या ओबीसींची सत्ता आणल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. कुणब्यांचे दाखले देतायत ते ताबडतोब बंद करा, अन्यथा २४ च्या निवडणुकीत कुठे पाठवायचं हे ओबीस ठरवेल. पालावरच्या भटक्या विमुक्तींच्या नोंदी का तपासल्या जात नाही, असेही शेंडगे म्हणाले.

लक्ष्मण गायकवाड म्हणाले की, विमुक्त भटके ओबीसी जोडा आणि प्रस्थापित मराठ्यांना पाडा. ईडा पीडा जाऊदे आणि ओबीसीचं राज्य येऊ द्या, आमच्या ताटात तुम्हाला जेऊ देणार नाही. ओबीसीचे राज्य आल्यावर तुमची गरिबी आम्ही दूर करू पण आमच्या ताटात तुम्हाला जेवू देणार नाही. मराठ्यांची गरिबी २०२४ ला ओबीसीचं राज्य आल्यावर दूर करू, असे लक्ष्मण गायकवाड म्हणाले.

रासप प्रमुख महादेव जानकर म्हणाले की, "ओबीसीचा जोपर्यंत पक्ष होत नाही, तोपर्यंत न्याय मिळणार नाही. जो पर्यंत ओबीसी समाजाचे पक्ष होत नाही, तोवर त्याला अर्थ राहत नाही. तर, काँग्रेस भाजपवाले तुम्हाला लुटून जातील असे जानकर म्हणाले आहे.




माजी आमदार आशिष देशमुख यावेळी बोलतांना म्हणाले की, ओबीसींना मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी स्पष्ट केले आहे की, सरसकटचे दाखले मराठा समाजाला देता येणार नाही. ओबीसी आणि मराठा समाजात तेढ निर्माण करण्याचं काम मनोज जरांगे करत आहेत. त्यामुळे, मनोज जरांगे यांनी आपला बाल हट्ट सोडावा, असे देशमुख म्हणाले.

काँग्रेस आमदार राजेश राठोड यावेळी बोलतांना म्हणाले की, "राज्यातले साखार कारखाने भटक्या आणि विमुक्त लोकांच्या जीवावर सुरू आहेत. ओबीसी नेत्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या विरोधात वक्तव्य थांबवायला हवेत. या पुढे ओबीसी नेत्यांच्या विरोधात बोलत असेल, तर मोठा भाऊ असलेल्या लोकांना छोट करायला वेळ लागणार नाही, असे आमदार राजेश राठोड म्हणाले.